पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान संतुलन

वर्ष : १३
अंक : ११ व १२

सौर कार्तिक व अग्रहायण, शके १९३६ / ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१४

संपादक : दिलीप कुलकर्णी

वार्षिक वर्गणी
₹ ३०

## विकासाच्या मोजपट्ट्या आणि विकासाचे पर्याय

ग.सं.च्या ह्या विशेषांकात आपण ह्या महत्त्वाच्या विषयाची चर्चा करणार आहोत.

सध्याचं विकासाचं वातावरण GDP ह्या एकाच मोजपट्टीनं/संकल्पनेनं व्यापून टाकलेलं आहे. विवेचनाची पार्श्वभूमी म्हणून प्रारंभी आपण त्या मोजपट्टीचा परिचय करून घेणार आहोत. GDPच्या आधारे राष्ट्रांचा विकास कसा मोजला जातो हे आधी पाहून, मग तीमधील दोष, उणीवा, अपुरेपणा—आणि लबाड्या—आपण समजून घेणार आहोत.

GDP ह्या मोजपट्टीचं तोकडेपण आणि त्रुटी लक्षात घेऊन अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी आणि अन्यही काहींनी विकासाच्या वास्तव मोजमापासाठी अधिक समावेशक, व्यापक अशा मोजपट्ट्या पुढे मांडल्या आहेत. त्यांचं स्वरूप, वेगळेपण आपण बघणार आहोत. 'विकासाच्या विविध मोजपट्ट्या आहेत' ही अनेकांसाठी 'बातमी' असू शकते! वस्तुत: अशा विविध मोजपट्ट्या अनेक दशकं पुढे मांडल्या जात आहेत.

अशांपैकीच एक मोजपट्टी आहे GNH. आपल्या शेजारच्या भूतान ह्या देशानं त्या संकल्पनेच्या आधारे विकास करण्याचे प्रयत्न चार दशकं चालवले आहेत. तिचा आणि त्या प्रयत्नांचा सविस्तर परिचय आपण करून घेणार आहोत.

भूताननं विकासाची ही वेगळी दिशा स्वेच्छेनं स्वीकारली. क्यूबाला सुमारे २५ वर्षांपूर्वी अशीच एक वेगळी दिशा अगतिकतेनं स्वीकारावी लागली. पण, त्यांनी सेंद्रिय शेतीवर आधारित असं जे प्रतिमान निर्माण केलं, ते अत्यंत अनुकरणीय आहे. त्या प्रयत्नांचाही सविस्तर परिचय आपण करून घेणार आहोत.

भूतानला भेट देणारे अनेक जण आहेत. अशांनी भूतानविषयीचे आपले अनुभव लिहावेत असं आवाहन गेल्या अंकात केलं होतं. त्याला प्रतिसादपर आलेलं लेखनही ह्या अंकात समाविष्ट आहे.

ह्या सर्व मांडणीतून GDP-आधारित विकासाची घातकता वाचकांच्या लक्षात यावी; आपण नागरिकांनी ते प्रतिमान व्यक्तिगत जीवनात नाकारावं; शक्य तर एकत्र येऊन शासनाला पर्यायी प्रतिमान स्वीकारण्यास भाग पाडावं... असं काहीतरी घडण्याची अपेक्षा आहे. त्यादृष्टीनं आधी जे वैचारिक प्रबोधन आवश्यक आहे, ते करण्याचा हा प्रयत्न आहे.

ह्या ८ पानांमधली मांडणी विस्तृत नाही. तशी ती असूही शकणार नाही. वाचकांना अन्य वाचन करून, अन्य ठिकाणची माहिती मिळवून आपली जाण वाढवावी लागेल. अशा काही स्रोतांची सूची लेखांच्या शेवटी दिलेली आहे.

—*संपादक*

# GDP नावाची लबाडी


विकासाची सध्याची व्याख्या ज्या संकल्पनेशी घट्टपणे जोडलेली आहे, ती म्हणजे GDP : Gross Domestic Product. विकास म्हणजे 'GDP' ह्या परिमाणात मोजली जाणारी वाढ. (Development = Growth measured in terms of GDP.)

GDP म्हणजे 'एकूण राष्ट्रान्तर्गत उत्पन्न.' कोणत्याही एका आर्थिक वर्षात, एखाद्या राष्ट्रामध्ये, जे काही उत्पादन होतं, त्याची चालू बाजारभावानुसार किंमत म्हणजे त्या देशाचा GDP. ह्या आकड्याला 'Nominal GDP' असं म्हटलं जातं. पण, हा आकडा काहीसा फसवा असतो. चलनवाढीमुळे वस्तूंच्या किंमती वाढलेल्या दिसतात; नि त्यामुळे GDP काही न करताही वाढतो. उदाहरणार्थ, गेल्या वर्षीचा GDP समजा १ कोटी रुपये होता; नि चलनवाढीला दर ५% आहे; तर तेवढ्याच उत्पादनाची किंमत यंदा १ कोटी ५ लक्ष रुपये होईल. GDPमधली ही वाढ फसवी आहे. म्हणून 'Real GDP' नावाची दुसरी संकल्पना वापरली जाते. 'नॉमिनल GDP'ला 'GDP डीफ्लेटर'नं भागलं की, 'वास्तव GDP' मिळतो.

GDPमध्ये देशातलं शेती-उत्पादन, औद्योगिक उत्पादन, सेवा क्षेत्रातलं उत्पादन, सरकारी खर्च, आयात-निर्यातीतला फरक अशा बाबींचा अंतर्भाव होतो.

पण, विकास म्हणजे निव्वळ GDPचा आकडा मोठा असणं नव्हे. तो लहान असो वा मोठा : तो सतत वाढत राहणं म्हणजे विकास. जगातले काही देश 'अविकसित' किंवा 'मागास' म्हटले जातात; कारण, त्यांचा GDP खूप कमी आहे. ज्यांचा मध्यम प्रमाणातला आहे, ते 'विकसनशील' देश, अन् ज्यांचा खूप अधिक आहे ते 'विकसित' देश. जणू शिडीच्या वरच्या-वरच्या पायऱ्यांवर ते उभे आहेत. मागास आणि विकसनशील देशांचा प्रयत्न हा शिडीच्या वरच्या-वरच्या पायऱ्या चढत जाऊन 'विकसित' होण्याचा असतो. पण, म्हणून, विकसित देश 'आपला GDP भरपूर मोठा आहे : आता इथेच थांबू या' असं म्हणतात की काय?—मुळीच नाही. त्यांनाही शिडीच्या आणखी-आणखी वरच्या पायऱ्यांवर चढायचं आहे! कारण विकास म्हणजे GDPमधील 'वाढ'. GDP कमी असो वा अधिक : त्यात *सातत्यानं वाढ होत राहणं* हे महत्त्वाचं.

अशा वाढीला 'रेखीय वाढ' (linear growth) असं म्हटलं जातं. गेल्या वर्षीपेक्षा यंदाचा GDP अधिक; यंदापेक्षा पुढच्या वर्षीचा अधिक... अशी ही सतत होणारी वाढ असते. पण, तिचं स्वरूप वास्तवात 'रेखीय' असं न राहता, ती 'भूमिती-श्रेणीतली' वाढ (exponential growth) बनते. चक्रवाढ व्याजासारखा (compound growth) हा प्रकार असतो. तिचा आलेख 'सरळ रेषा' असा न दिसता,



भौमितिक वाढीच्या आलेखासारखा दिसतो. फक्त मुद्दलावर व्याज (सरळ व्याज) असा हा प्रकार नसून 'मुद्दल+व्याज' ह्यावर व्याज अशी ही 'चक्रवाढ' असते.

ह्या GDPच्या वाढीचं जे प्रमाण असतं, त्यालाच 'वाढीचा दर' (growth rate) असं म्हणतात. प्रत्येक राष्ट्राचा प्रयत्न हा आपला वृद्धिदर अधिकतम राखण्याचा असतो. ३.४%, ५.५%, ७.२% अशा प्रकारानं हा दर सांगितला जातो. 'गेल्या वर्षीपेक्षा यंदाचा GDP किती प्रतिशतानं अधिक आहे' हे सांगणं म्हणजे वृद्धिदर सांगणं. सामान्यत: हा दर एक अंकी असतो. चीनसारख्या काही देशांचा वाढीचा दर १०%हून अधिक आहे. अशी 'double digit growth' हे सर्व राष्ट्रांचं उराशी बाळगलेलं स्वप्न असतं. ते प्राय: अपुरंच राहतं.

राष्ट्राचं एकूण उत्पन्न सांगण्याची दुसरी मोजपट्टी आहे GNP (Gross National Product). पूर्वी ती अधिक प्रचारात होती. GDP आणि GNPमध्ये थोडासा फरक आहे. GDP म्हणजे 'final output produced inside a nation'; तर GNP म्हणजे 'produced by the factors owned by a nation'.

आता पुढचा मुद्दा. एखाद्या देशाचा GDP भरपूर मोठा आहे, म्हणजे तो देश विकसित मानायचा का? असं मानता येत नाही; कारण एखादा देश जर आकारानं खूप मोठा असेल, तर त्याचा GDPही मोठाच असणार. श्रीलंका किंवा नेपाळ ह्यांच्यापेक्षा भारताचा GDP सदैवच अधिक असणार हे उघड आहे. पण, म्हणून 'भारत हा अधिक विकसित आहे' असं खात्रीनं म्हणता येईल का?

—ह्यातून मार्ग काढण्यासाठी 'दरडोई एकूण राष्ट्रीय उत्पन्न' (per capita GDP) हे परिमाण वापरलं जातं. GDPच्या भल्या मोठ्या आकड्याला त्या देशाच्या लोकसंख्येनं भागलं की, per capita (दरडोई) आकडा मिळतो. परस्परांशी तुलना करण्यासाठी तोच वापरतात. समजा दोन देशांचा GDP समान आहे; तर, ज्या देशाची लोकसंख्या कमी, त्याचा दरडोई GDP अधिक असेल, नि म्हणून तो देश अधिक विकसित.

ही झाली राष्ट्रीय स्तरावरचा विकास मोजण्याची मोजपट्टी. अशाच आणखी दोन अर्थशास्त्रीय मोजपट्ट्या आहेत, ज्या व्यक्तीच्या स्तरावरचा विकास मोजतात. एक आहे 'दरडोई उपभोग' नि दुसरी आहे 'दरडोई उत्पादन.' प्रत्येक जण विविध गोष्टींचा उपभोग घेत असतो. मग त्या गोष्टीचा 'प्रतिव्यक्ती उपभोग' किती हे बघायचं. Per capita consumption जितकं अधिक, तितक्या त्या देशातल्या व्यक्ती अधिक विकसित. दर दिवशी १० लिटर पाणी वापरणारा अविकसित; तर २०० लिटर पाणी वापरणारा विकसित. वर्षाला १० कि.ग्रॅ. साखर खाणारा अविकसित; तर १०० कि.ग्रॅ. साखर खाणारा विकसित... असं. जेव्हा 'प्रति-व्यक्ती' विचार करता येत नाही, तेव्हा '१००० लोकसंख्येमागे किती' अशीही मांडणी केली जाते. उदाहरणार्थ, १००० लोकसंख्येमागे किती दूरचित्रवाणी संच; किती मोटारगाड्या; किती भ्रमणभाष संच; इत्यादी. ते जितके अधिक, तितका विकास अधिक.

एकीकडे वस्तूंचा उपभोग घेत असताना, दुसरीकडे त्या वस्तूंचं उत्पादनही व्हायला हवं. त्यातूनच 'दरडोई उत्पादन' ही मोजपट्टी पुढे आली आहे. 'दरडोई उपभोग' अधिक असण्यासाठी 'दरडोई उत्पादन'ही अधिक असायला हवं. दरडोई उत्पादन वाढलं की, GDP देखील आपोआपच वाढतो.

ह्यातून एक मध्यवर्ती सूत्र असं पुढे येतं की, अधिकाधिक विकसित होण्यासाठी, अधिकाधिक उपभोग घेणं ही आवश्यक बाब आहे. अधिक उपभोग म्हणजे अधिक विकास. उपभोग ही विकासाची प्रेरक शक्ती आहे. त्यामुळे विकासाचं सध्याचं ध्येय आहे उपभोगांचं उच्चतमीकरण. 'Maximization of consumption'. त्याला अनुषंगून दुसरं ध्येय 'उत्पादनाचं उच्चतमीकरण' : Maximization of production. हातून साध्य होते GDPमधली वाढ. म्हणजेच 'विकास.' तिलाच 'बृहद् आर्थिक वाढ' (macro economic growth) असं म्हणतात. काही अपवाद वगळता सर्व राष्ट्रांचं ध्येय तेच आहे. अशी आर्थिक वाढ होत होत सर्वच राष्ट्रं हळूहळू विकसित बनताहेत.

* * *

जर गेली दीड-दोनशे वर्षं सगळेच असे विकसित होताहेत, तर एव्हाना सगळे सुखी व्हायला हवे होते, नाही का? सगळ्या गोष्टींचं भरपूर उत्पादन होतंय; सगळे जण भरपूर उपभोग घेताहेत; त्यामुळे सर्व जण सुखी-समाधानी-आनंदी आहेत; कुणापुढेही काहीही समस्या नाहीत... असं चित्र दिसायला हवं होतं, नाही का?

पण, प्रचंड 'विकास' होऊनही चित्र ह्याच्या उलटंच दिसतं! जे दरिद्री, वंचित, मागास असे आहेत—एवढा 'विकास' होऊनही मोठ्या संख्येनं जगात असे लोक आहेत!—ते दु:खी, असमाधानी असतील हे एक वेळ मान्य करता येईल; पण, दरडोई उत्पादन–उपभोग–GDP भरपूर मोठा असणारे देश आणि तिथली जनताही दु:खी, असमाधानी का? असंख्य समस्यांनी ग्रस्त का? शारीरिक आणि मानसिक व्याधींनी ग्रस्त का? एवढी आर्थिक वाढ होऊनही वास्तव असं का?

—ह्या सगळ्या 'कां'ची उत्तरं ती आर्थिक वाढ—म्हणजेच 'विकास'—हेच आहे! वरवर पाहता योग्य वाटणारी विकासाची ही संकल्पनाच सर्व समस्यांचं कारण आहे. ती अत्यंत संकुचित, ऱ्हस्व दृष्टीची, एकांगी, अपूर्ण अशी संकल्पना आहे. अन् ती तशी असल्याचं दिसून आल्यानंतरही अर्थशास्त्रज्ञ तीत बदल करायला तयार नसल्यानं, त्यात त्यांची काहीतरी लबाडी आहे असं वाटायला लागतं. अर्थशास्त्रज्ञांची ही संकुचितता, ऱ्हस्वदृष्टी, एकांगिता, अपूर्णता आणि लबाड्या थोडक्यात समजून घेऊ या :

(१) GDPच्या संकल्पनेत 'सततची वाढ' अपेक्षित आहे. अशी वाढ होणं चांगलं नि म्हणून वांछनीय मानलं जातं. वस्तुत: निसर्गात 'फक्त वाढ' अशी कधीच नसते : वाढ आणि घटीचं एक चक्र असतं. अर्थशास्त्राला अशी चक्रीयता मान्य नाही. जीत चक्रीयता नाही, अशी गोष्ट निसर्गात फार काळ टिकू शकत नाही. पण, अर्थशास्त्रज्ञ ह्या मूलभूत बाबीकडेच डोळेझाक करून वाढीचा हेका कायम ठेवतात.

(२) अशी जी अनिर्बंध, अनंत वाढ असते तिला 'cancerous growth' असं म्हणतात. कर्करोगाच्या पेशी ज्याप्रमाणे अनिर्बंधपणे मूळ सजीव मरेपर्यंत विभाजित होत राहतात, तसं ह्या वाढीचं आहे. ही कर्करोगासारखी वाढ आहे.

(३) वाढ चांगल्याचीही असू शकते किंवा वाईटाचीही. अर्थशास्त्र हा भेद करण्याचं जाणीवपूर्वक टाळतं. अशा वाढीला 'गुण-दोष-भेदरहित वाढ' (undifferntiated growth) असं म्हणतात. GDP वाढण्याशी मतलब : तो धान्योत्पादन वाढल्यामुळे वाढला; की, दारू, गुटखा ह्यांचं उत्पादन वाढल्यामुळे वाढला, ह्याच्याशी अर्थशास्त्राला देणंघेणं नसतं. ते धान्योत्पादनही जमिनीचा कस टिकवून ठेवून वाढलं; की, कस उणावून वाढलं, हे अर्थशास्त्र पाहत नाही.

(४) GDPमध्ये सगळ्याची फक्त बेरीज होते. वजावट करण्याची त्यात पद्धतच नाही. धान्योत्पादन रासायनिक खतांमुळे वाढलं की, GDP वाढतो; पण, त्यामुळे जमिनीचा कस कमी होऊन ती हळूहळू नापीक बनत जाते, ह्याची वजावट मात्र GDPमधून होत नाही. खनिज तेलांचं उत्पादन वाढलं की, GDP वाढतो; पण त्यामुळे एक अ-नवीकरणक्षम संसाधन संपलं ह्याची वजावट मात्र नाही. वाहनांचं उत्पादन वाढलं की, GDP वाढतो; पण त्यामुळे प्रदूषण-अपघात वाढले ह्याची वजावट त्यातून होत नाही. सारांश, GDPच्या ताळेबंदाला फक्त जमेची बाजू आहे : खर्चाची बाजूच नाही! तो Balance Sheet नसून Imbalance sheet आहे!

(५) हे जाणूनबुजून, हेतुत: केलं जातं. 'GROSS'चा आग्रह त्यासाठीच आहे. GROSS production मधून 'सर्व' खर्च वजा केले, तर NET production किती हे कळू शकेल. पण ते ऋणात्मकच (negative) असतं. म्हणजे मग विकास होत नसून विनाशच होत आहे हे उघड होईल. विकासाचा राजा नागडा आहे, हे सिद्ध होईल. म्हणून सर्व खर्च ताळेबंदाबाहेर ठेवले जातात, नि 'GROSS production वाढतंय म्हणून 'विकास' होतोय' असा भ्रम निर्माण केला जातो. ह्या प्रक्रियेला अर्थशास्त्रीय परिभाषेत 'खर्चांचं बहि:स्थी-

*ह्या अंकातील लेख, उल्लेख नसल्यास, दिलीप कुलकर्णी ह्यांनी लिहिलेले आहेत.*

करण' (externalization of costs) असं म्हटलं जातं. सर्व खर्च इकडचे तिकडे नि आजचे उद्यावर ढकलले जातात. (Shifting in space and time.)

(६) पण, असे खर्च ताळेबंदाच्या बाहेर ठेवले, तरी ते पृथ्वीच्या, निसर्गाच्या बाहेर कसे टाकता येणार? कुणाला ना कुणाला तरी ते सोसावेच लागणार! अर्थशास्त्रानं बहि:स्थ केलेले खर्च सर्व सजीवांना अंत:स्थ करणं भाग पडतं. अर्थशास्त्र प्रदूषणाला बहि:स्थ करतं; ते वनस्पती, पशुपक्षी, तुम्ही-आम्ही सर्व मानव अंत:स्थ करतो. त्याची किंमत प्रदूषित हवा-पाणी-जमीन-अन्न ह्यांमुळे होणाऱ्या हानीच्या रूपानं आपल्यालाच मोजावी लागते. पाणी, वनं, उपजाऊ जमीन, खनिज धातू, खनिज तेल, खनिज कोळसा अशी सर्व संसाधनं घटत-संपत जातात, त्या ऱ्हासाची किंमत भावी पिढ्यांना उपासमारीच्या रूपानं मोजावी लागणार आहे. हे आजचं आणि उद्याचं वास्तव सूर्यप्रकाशासारखं स्वच्छ-स्पष्ट असूनही अर्थशास्त्रज्ञ आपली अंकनाची पद्धत बदलण्यास जराही तयार नाहीत.

(७) वास्तवाची जाण नसलेलं हे अर्थशास्त्र, त्यामुळेच एक 'भ्रम' बनलेलं आहे. ती तुम्हा-आम्हा सर्वांची घोर फसवणूक आहे. विकासाच्या समप्रमाणातच नैसर्गिक संसाधनं आणि ऊर्जा-संसाधनं संपत आहेत, जैव विविधता घटते आहे; प्रदूषण आणि कचरा वाढत आहे. म्हणजेच, भविष्यकाळातील वाढ धोक्यात आणणारी ही आजची आत्म-पराजयक (self defeating) वाढ आहे. ह्या वाढीला विकास म्हणायचं तर, तो न टिकणारा, अल्पकालिक, अ-धारणाक्षम (non-sustainable) असा आहे.

(८) ही आर्थिक वाढ होत असताना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि ऊर्जांचा क्रमश: वाढता वापर केल्यानं रोजगाराच्या संधी क्रमश: कमी प्रमाणात निर्माण होतात. त्यामुळे ह्या वाढीला 'रोजगारविहीन वाढ' (jobless growth) असं म्हटलं जातं. त्या दृष्टीनंही ती समस्याजनक आहे.

(८) अनिर्बंध वाढ ही केवळ निसर्गासाठीच घातक, विनाशक आहे असं नाही; तर व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र ह्या अन्य खालच्या स्तरांवरही घातक-विनाशक असल्याचं दिसून येत आहे.

अ) व्यक्तीचा स्तर : 'अधिक उपभोग म्हणजे अधिक विकास' हे सत्य आहे का? व्यक्ती किती उपभोग घेऊ शकते, ह्याला आतून एक मर्यादा असते. 'जास्त साखर खाणं म्हणजे अधिक विकास' असं असेल, तर मग मधुमेहाचं काय? 'खनिज तेलांचा अधिक वापर म्हणजे अधिक विकास' असं असेल, तर प्रदूषणजन्य व्याधींचं काय? हेच मानसिक स्तरावरही : अधिक उपभोग, अधिक उत्पादन, अधिक वाहतूक ह्या साऱ्यामुळे जीवनाचा वेग, जीवनाचं क्षेत्र आणि जीवनातली गुंतागुंत अतिरेकी प्रमाणात वाढते. ह्यातून मनावरचा ताण (stress) अतिरेकी प्रमाणात वाढतो. त्यातून उद्भवणाऱ्या 'मनोजन्य शारीरिक व्याधीं'नी सारं जग ग्रस्त आहे. ही आर्थिक वाढीचीच 'व्यक्ती' ह्या स्तरावरची किंमत आहे. तथापि, ह्या शारीर-मानस व्याधींवरील उपचारांमुळे GDP वाढून 'विकास' होतो!

आ) कुटुंबाचा स्तर : अधिक उपभोगासाठी अधिक पैसा लागतो. त्यातून दोघांची नोकरी/व्यवसाय, परस्परांसाठी वा कुटुंबातील व्यक्तींसाठी वेळ नसणं, कुटुंबाची वीण सैल होणं, दुर्लक्षित मुलं/ज्येष्ठ, मुलांच्या वाढत्या समस्या/गुन्हेगारी; समायोजनाचा अभाव; त्यातून वादावादी-घटस्फोट; एक-पालकी कुटुंबं; 'मुलंच नकोत' असं वाटणं; त्यातून कॉंट्रॅक्ट मॅरेज, लिव्ह-इन संबंध असे कुटुंबव्यवस्थाच पार उद्ध्वस्त करणारे प्रकार वाढीला लागणं... ह्या साऱ्या 'कुटुंब' ह्या स्तरावरच्या किंमती आहेत. ह्यांवरील उपाययोजनांमुळेही GDP वाढून 'विकास' होतो!

इ) सामाजिक स्तर : 'दरडोई' (per capita) ह्या पद्धतीच्या मांडणीमध्ये समाजातली विषमता चलाखीनं लपवली जाते. जणू काही ती गोष्ट प्रत्येक व्यक्तीला त्या प्रमाणात मिळते आहे, असं भासवलं जातं. प्रत्यक्षात मात्र उपभोगांत पराकोटीची विषमता आहे. तीमुळेच सामाजिक असंतोष वाढतो. समाजातले 'आहे रे' गट 'नाही रे'चं शोषण करतात. त्यातून समाजातली व्यसनाधीनता, गुन्हेगारी, खूनखराबा, दंगली, आंदोलनं वाढतात. अत्याचार, दडपशाही वाढते. समाजाचं विघटन होतं. पोलीस, लष्कर, न्यायालये ह्यांचा वापर करून समस्या कशाबशा नियंत्रणात ठेवाव्या लागतात. मात्र, ह्या सगळ्यामुळे GDP वाढून 'विकास' होतो, हे विसरायचं नाही!

ई) राष्ट्रीय स्तर : सामाजिक स्तरावरच्या समस्या ह्या एका दृष्टीनं राष्ट्रीय स्तरावरच्याही असतात. शिवाय राष्ट्रीय स्तरावर मागास वा निसर्गसमृद्ध विभागांचं उद्योगांकडून शोषण; शहरांचा खेड्यांवर वसाहतवाद; उद्योगीकरण, शहरीकरण, प्रकल्पांमुळे होणारं विस्थापन अशाही अनेकानेक समस्या निर्माण होतात. त्यांवरच्या उपाययोजना हा सरकारचा खर्च (government expenditure) असल्यानं, तो GDPमध्ये भर घालतो! GDP वाढवण्यासाठी देशाची निर्यात वाढणं आवश्यक असतं. त्यामुळे जी वस्तू विकून परकीय चलन मिळतं, तिची निर्यात करण्याचं धोरण असतं. परिणामत: देशातील जनतेला काही वस्तूंपासून वंचित राहावं लागतं; किंवा चांगला माल निर्यात झाल्यानं कमी दर्जाच्या वस्तूंवर समाधान मानावं लागतं.

उ) आंतरराष्ट्रीय स्तर : आज जे देश विकसित आहेत, किंवा जे स्वत:चा वेगानं विकास करून घेत आहेत, त्यांना शोषण आणि वसाहतवाद ह्यांचा आश्रय घ्यावाच लागलेला/लागतो आहे. GDPमधली सातत्यपूर्ण वाढ ही शोषणाशिवाय साध्य होऊच शकत नाही. विकसित युरोपीय राष्ट्रांच्या आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका इथे वसाहती होत्या. त्यांच्या प्रचंड शोषणातूनच ती राष्ट्रं विकसित झाली. अमेरिकेनं असा वसाहतवाद न गाजवता आफ्रिकी गुलामांची आयात केली, नि त्यांच्या श्रमशक्तीचं शोषण करून आपला विकास साधला. आता राजकीय वसाहतवादाची जागा आर्थिक वसाहतवादानं घेतलेली आहे, एवढंच. एकीकडे आर्थिक शस्त्रं; नि दुसरीकडे अत्याधुनिक, महासंहारक सामरिक शस्त्रास्त्रं ह्यांच्या जोरावर आज वसाहतवाद गाजवला जातो. जागतिक अशांतता, युद्धखोरी, शस्त्रस्पर्धा, अण्वस्त्रांचे ढीग ही सारे आर्थिक वाढीचीच फळं आहेत.

ऊ) पर्यावरणाचा स्तर : GDP वाढवत नेताना, ती वाढ ज्याच्या जिवावर होणार त्या निसर्गाच्या जपणुकीचा कोणताही विचार केला जात नाही. निसर्ग किती संसाधनं-ऊर्जा पुरवू शकतो; किती काळ पुरवू शकतो; किती प्रदूषण सहन करू शकतो; जैव-विविधता किती घटून चालू शकते; लोकसंख्या आणि तिचे उपभोग किती वाढून चालू शकतात... कशा-कशाचाच विचार अर्थशास्त्र करत नाही. जेव्हा अर्थशास्त्र रचलं गेलं तेव्हा संसाधनं-ऊर्जास्रोत खरोखरच भरपूर होते. प्रदूषण अत्यंत कमी होतं. जैववैविध्य भरपूर होतं. पण, अडीचशे-तीनशे वर्षांच्या आर्थिक वाढीनंतर परिस्थिती पूर्णपणे पालटलेली असूनही त्याच ध्येयाचा—अधिकाधिक ताकदीनिशी—पाठलाग चालू आहे. ही वाढ अ-धारणाक्षम असूनही अर्थशास्त्र वास्तववादी बनवण्याची अर्थतज्ज्ञांची तयारी नाही. आपल्या ऐतिहासिक चुका मान्य करून शास्त्रात त्याप्रमाणे सुधारणा/बदल करण्याची गरज त्यांना वाटत नाही.

* * *

सारांश, वर्तमान आणि भविष्य ह्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणारी, कालबाह्य ऐतिहासिक संकल्पनांवर आधारलेली, अशी ही आर्थिक वाढीची संकल्पना आहे. मुळात 'आर्थिक वाढ होते आहे' हीच खोटी गोष्ट आहे : हिशेबात खर्चच न दाखवता जमा वाढत असल्याचं दाखवलं जात आहे. वास्तवात हे सारे खर्च आपल्यालाच आजही भोगावे लागत आहेत; उद्याही भोगावे लागणार आहेत.

म्हणजेच वास्तवात होतोय विनाश : त्यालाच लबाडीनं म्हटलं जातंय विकास!

# नव्या मोजपट्ट्या

*GDPतून दिसणारं विकासाचं चित्र भ्रामक असतं हे ज्यांना जाणवतं, अशा अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आणि विचारवंतांनी अधिक व्यापक, समावेशक, वास्तववादी अशा नवनव्या मोजपट्ट्या पुढे ठेवल्या आहेत.*

ह्या जगात जसे चोर आहेत, तसेच सज्जनही. अर्थशास्त्रज्ञांचंही तसंच आहे : ते सर्वजणच काही लबाड नाहीत. त्यांच्यातही काही जण प्रामाणिक आहेत. अशांना GDPच्या आधारे विकासाचं मोजमाप करण्यातल्या त्रुटी, अपुरेपणा आणि चुका जाणवतात. GDPतून दिसणारं विकासाचं चित्र भ्रामक असतं, हे त्यांना जाणवतं. अशांपैकी अनेकांनी अधिक व्यापक, अधिक समावेशक, अधिक वास्तववादी अशा मोजपट्ट्या पुढे ठेवल्या आहेत. त्यांपैकी काही अशा :

***Net National Welfare*** : जपानी अर्थज्ञ प्रा. शिगेटो त्सुरू ह्यांनी ही मोजपट्टी प्रस्तुत केली आहे. GDPमध्ये अनेक वाईट गोष्टीही जमेच्या बाजूलाच दाखवल्या जातात. NNWमध्ये मात्र वाहनांचे अपघात नि त्यांमुळे होणारा खर्च; वाहतुकीच्या कोंडीमुळे होणारी हानी; प्रदूषण-निवारणार्थ होणारे खर्च; सार्वजनिक सुविधांची ढासळलेली स्थिती अशा बाबी खर्चाच्या बाजूला दाखवून त्यांची Grossमधून वजावट केली जाईल, नि त्यातून 'नक्त उत्पन्ना'चा अंदाज येईल.

***çeasure of Economic Welfare*** : जेम्स टोबिन आणि विल्यम वॉर्डहॉस प्रस्तावित ही मोजपट्टी बरीचशी वरच्यासारखीच आहे.

***Quality of Life*** : अमेरिकेतील मिडवेस्ट रिसर्च इंस्टिट्यूटनं ही मोजपट्टी पुढे ठेवली आहे. GDPमध्ये फक्त संख्यात्मक विचार आहे. ही मोजपट्टी मात्र 'जीवनाची गुणवत्ता' मोजू पाहते. 'GDP अधिक आहे, म्हणजे त्या देशातील जनतेच्या जीवनाची गुणवत्ता चांगली आहे' असं म्हणता येत नाही. म्हणून हा quantityपासून फारकत घेऊन quality मोजण्याचा प्रयत्न. (किंबहुना, बऱ्याचशा नव्या मोजपट्ट्या ह्या गुणात्मक बाबींकडे लक्ष वेधतात.)

***Physical Quality of Life Indicator*** : ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सिलनं तयार केलेली ही मोजपट्टी बऱ्यापैकी व्यापक आहे. तिच्यात खालील बाबींचा अंतर्भाव आहे : (१) जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता कशा प्रकारे होत आहे. (२) बालमृत्यूचं प्रमाण. (३) सरासरी आयुर्मान. (४) साक्षरतेचं प्रमाण. (५) आरोग्य-सेवांची उपलब्धता. (६) शिक्षणाच्या सोयी. (७) रोजगारांची उपलब्धता, इत्यादी. १ ते १०० अशा मोजपट्टीवर गुणांकन केलं जातं. केवळ GDP वाढला म्हणून ह्या बाबींमधली सुस्थिती वाढतेच असं नाही. आकडेवारी असं दाखवते की, GNP अधिक असणाऱ्या अनेक देशांचा PQLI कमी आहे; तर GNP कमी असूनही PQLI अधिक आहे. उदाहरणार्थ, इराण (दरडोई GNP १२५० डॉलर; PQLI ३८); कुवेत (११,७७०–७६); तर श्रीलंका (१३०–८३), आणि क्यूबा (६४०–८६). अमेरिका (६६७०–९६), ब्रिटन (३,५९०–९७) हे दोन्ही कसोट्यांवर 'विकसित' दिसतात.

***Country Futures Indicators*** : हेझेल हेंडरसन ह्या विदुषीनं पुढे ठेवलेली ही एक व्यापक मापन-प्रणाली आहे. 'विकास' मोजताना ज्या अनेक बाबींचा विचार झाला पाहिजे त्यांची ही एक जंत्रीच आहे. अनौपचारिक/घरगुती उत्पादन, सामाजिक विषमता ह्या बाबींची दखल घेणं; आर्थिक वाढीमुळे निर्माण झालेल्या सामाजिक आणि पार्यावरणिक खर्चांची वजावट करणं; अ-नवीकरणक्षम संसाधनांची वजावट करणं; ऊर्जा आणि GDP ह्यांचं गुणोत्तर तपासणं; सरकारी खर्चापैकी लष्करावरचा किती आणि नागरी सुविधांवरचा किती हे बघणं; लोकसंख्या, शिक्षणाचं प्रमाण, आरोग्यस्थिती, पोषण, निवारा, सामाजिक सुरक्षा, मुलांचा विकास, जनतेचा राजकीय सहभाग, अल्पसंख्याकांची स्थिती, प्रदूषण/पर्यावरणाची स्थिती अशा अनेक बाबींचा ह्या यादीत समावेश आहे. ह्यांचं मोजमाप, गुणांकन कसं करायचं हे मात्र तिनं स्पष्ट केलेलं नाही.

***Basic Human Needs*** : युनायटेड नेशन्स एन्व्हायरॉनमेंट प्रोग्रॅमनं सुचवलेली ही मोजपट्टी आहे. सर्व मानवांच्या मूलभूत गरजा (भौतिक, मानसिक आणि आध्यात्मिक) कशा प्रकारे मोजायच्या ह्याची पद्धत तीत दिलेली आहे. केवळ आर्थिक वाढीऐवजी मूलभूत गरजांच्या पूर्ततेकडे ती लक्ष देते.

***Index of Sustainable Economic Welfare*** : 'Steady State Economy'चा पुरस्कार करणाऱ्या हर्मन डॅली ह्या अर्थतज्ज्ञानं पुढे मांडलेली ही संकल्पना. आर्थिक 'वाढी'ऐवजी आर्थिक 'कल्याणा'ची संकल्पना, आणि तिच्या टिकाऊपणाचा, धारणाक्षमतेचा विचार ही तिची वैशिष्ट्यं.

***Human Development Index*** : United Nations Development Programmeनं ही मोजपट्टी वापरायला १९९०च्या दशकापासूनच प्रारंभ केला आहे. तिच्या अंतर्गत सरासरी आयुर्मान, शैक्षणिक दर्जा, जनतेची क्रयशक्ती अशा निकषांवर जगातील राष्ट्रांची क्रमवारी लावली जाते. ह्याच उपक्रमानं त्याच्या Human Development Reportमधून जगातली आर्थिक विषमता, रोजगारविहीन वाढ, लिंगाधारित विषमता, मानवी जीवनाची सुरक्षितता असे अनेक पैलू पुढे ठेवले आहेत.

***Gross National Happiness*** : भूतानचे माजी राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक ह्यांनी ही संकल्पना मांडली आहे. तिची मांडणी आणि वैशिष्ट्यं ह्यांचा सविस्तर विचार ह्याच अंकातील स्वतंत्र लेखात केलेला आहे.

* * *

तर, अशा ह्या विविध मोजपट्ट्या. त्या परिपूर्ण आहेत असा दावा त्यांचे प्रस्तुतकर्तेही करणार नाहीत; कारण 'विकास' ही संकल्पनाच इतकी सर्वस्पर्शी आणि बहुआयामी आहे की, काही निवडक निकषांच्या आधारे तिचं वास्तव चित्र रेखाटणं अशक्य आहे. अनेक बाबतीत गुणांकन कसं करायचं ही देखील एक समस्या आहे. दुसरं म्हणजे ह्या मोजपट्ट्याही अनेक बाबी विचारांत घेतच नाहीत. उदाहरणार्थ, अमेरिकेचा PQLI मोठा आहे. (९६/१००). पण, वास्तवात तिथल्या जनतेचं भौतिक जीवनमान कसं आहे?—ती सदैव असमाधानी, वखवखलेली असते. खून होण्याची, अण्वस्त्रांची अशा भीतींनी ती ग्रस्त आहे. भविष्याच्या चिंतेनं ती सदैव ग्रासलेली असते. अतिरेकी मानसिक तणावांमुळे हृद्रोग, रक्तदाब, कर्करोग, मधुमेह अशा मनोशारीरिक व्याधींची तिथे जणू साथच आहे. स्वैराचार, लैंगिकता, व्यसनाधीनता सर्वत्र बोकाळलेली आहे. घटस्फोट, एक-पालकी कुटुंबांचं प्रमाण प्रचंड आहे. संस्थात्मक हिंसा, माफिया राज, उद्योगांचे हस्तक असणारे नेते ह्या सामाजिक-राजकीय समस्यांनी तो देश ग्रस्त आहे. ते राष्ट्र प्रचंड उधळं आहे; प्रचंड कचरा निर्माण करणारं आहे; युद्धखोर आहे; दहशतवादाला प्रोत्साहन देणारं आहे; स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी वाटेल ते करणारं आहे. हे सारं PQLIमध्ये कुठे प्रतिबिंबित होतं? म्हणजे ह्या मोजपट्ट्याही परिपूर्ण नाहीतच. तथापि, ह्या साऱ्या मोजपट्ट्या GNP/GDP ह्या निकषांच्या आधारे सर्व राष्ट्रांचा विकास मोजण्याला विरोध करतात, आणि अन्याय्य निकषांची गरज प्रतिपादन करतात, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. त्यांतून दिसणारं विकासाचं चित्र परिपूर्ण नसलं, तरी GDPमधून दिसणाऱ्या अतिभ्रामक-अतिविकृत चित्रापेक्षा ते जरा अधिक वास्तव, यथार्थ आहे हे मात्र निश्चित.

पण, ह्या नव्या, अपुऱ्या मोजपट्ट्यांचा स्वीकार केल्यासही सध्या 'विकास' होत नसून 'विनाश' होत आहे हे उघड होईल, नि अर्थतज्ज्ञांची लबाडी साऱ्या जगाला कळून येईल. त्यामुळे मुख्यप्रवाही अर्थविचारांत ह्या मोजपट्ट्यांना जराही शिरकाव करू दिला जात नाही. सारं जग GDPची झापडं लावूनच आपला 'विकास' करून घेत आहे!

# GNHचा आग्रह धरणारा भूतान

सारं जग GDP ह्या भ्रामक, घातक ध्येयाचा पाठलाग करत असताना आपल्या शेजारच्या एका छोट्याशा देशानं GNH नावाची विकासाची एक व्यापक मोजपट्टी स्वीकारून आपल्या विकासनीतीला तीनुसार आकार देण्याचे प्रयत्न ४ दशकं चालवले आहेत. त्या संकल्पनेचा हा सविस्तर परिचय.

गेल्या काही दशकांमध्ये विकासाच्या एका आगळ्यावेगळ्या मापदंडानं साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. (अर्थातच मुख्यप्रवाही लबाड अर्थशास्त्रज्ञ सोडून!) ती मोजपट्टी आहे Gross National Happiness. जगाच्या खिसगणतीतही नसलेल्या एका देशानं ती प्रस्तुत करावी, ही सर्वांत आश्चर्याची गोष्ट आहे.

गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत भूताननं स्वत:ला जगापासून पूर्णपणे अलिप्त ठेवलेलं होतं. १९व्या शतकातील अनेक बंडाळ्या आणि यादवी लढायांनंतर १९०७मध्ये भूतानात राजेशाहीची स्थापना झाली. उग्येन वांगचुक, जिग्मे वांगचुक ह्या पहिल्या दोन राजांनी १९५२पर्यंत राज्य केलं. तिसरे राजे जिग्मे दोरजी वांगचुक ह्यांनी भूतानच्या आधुनिकीकरणाचा प्रारंभ केला. प्रशासनाला आधुनिक चेहरा देणं, संसदेची स्थापना, रॉयल ॲडव्हाजरी कौन्सिलची स्थापना, मंत्रिमंडळाला मान्यता, भूतानला यूनोचं सदस्यत्व मिळवणं, भारताशी सहकार्याचा करार अशा विविध बाबींद्वारे त्यांनी भूतानला एक 'आधुनिक राष्ट्र' म्हणून प्रस्थापित केलं.

त्यांच्या निधनानंतर चौथे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक ह्यांनी सत्ताग्रहण केलं. १९७२मधल्या सत्ताग्रहणाच्या वेळी ते अवघे १७ वर्षांचे होते. राजेपद स्वीकारल्यावर त्यांनी एक अमेरिकी वृत्तपत्राला मुलाखत देताना 'GNH' ही संकल्पना मांडली : 'केवळ अधिक GDP जनतेला अधिक आनंद/समाधान देऊ शकत नाही; GNH हा GDPपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे' हे ह्या द्रष्ट्या राजाचे १७व्या वर्षीचे उद्गार आहेत! आपल्या पिताश्रींनी सुरू केलेली लोकशाहीकरणाची प्रक्रिया त्यांनी पूर्णत्वाला नेली : आपली कार्यकारी सत्ता हळूहळू लोकांकडे सुपूर्त केली. १९८१मध्ये जिल्हा-विकास-समित्यांची स्थापना; १९९१मध्ये गट-विकास-समित्यांची स्थापना; १९९८मध्ये लोकांनी निवडलेल्या मंत्रिमंडळाला सर्व कार्यकारी अधिकार बहाल करणं; दोन तृतीयांश बहुमतानं राजालाही अपात्र ठरवण्याचा अधिकार संसदेला देणं; २००१मध्ये घटना-समितीची स्थापना करणं अशा तऱ्हेची ही वाटचाल होती. २००६मध्ये, अवघ्या ५२व्या वर्षी स्वेच्छेनं सत्तात्याग करून त्यांनी आपले तरुण पुत्र, पाचवे राजे जिग्मे खेसर ह्यांना राजसिंहासनावर बसवलं. २००८मध्ये भूताननं घटनात्मक राजेशाहीचा स्वीकार केला.

राजे जिग्मे सिंग्ये ह्यांचं वेगळेपण, दूरदृष्टी आणि क्रांतदर्शित्व हे सारं 'GNH' ह्या संकल्पनेतून व्यक्त होतं. GDP ह्या भ्रामक ध्येयाचा पाठलाग करून विनाशाला आमंत्रण देणारे जगातले सर्व देश पाहिल्यावर GNH-मागील दृष्टी आणि भाव थक्क करून सोडतो. 'विकास' ह्या विषयावर जन्मभर काम करणाऱ्या विद्वानांच्याही आवाक्यात न आलेली विकासाची एक व्यापक, समावेशक संकल्पना १७ वर्षांच्या एका युवकानं मांडली! नुसती घोषणा म्हणून ती मांडली असं नाही; तर पुढची पस्तीस वर्षं ती विकसित केली. त्या दृष्टीनं भूतानमधल्या विद्वानांना कामाला लावून तिचे व्यावहारिक आयाम आणि कार्यपद्धती सुनिश्चित केली.

### GNH म्हणजे काय?

'राष्ट्रीय उत्पादनापेक्षा राष्ट्रीय आनंद अधिक महत्त्वाचा' असं राजे जिग्मे सिंग्ये ह्यांना वाटलं ह्यामागे त्यांचा व्यापक विचार होता. ते म्हणतात की, 'भूतानमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेली जंगलं तोडून लाकूड विकलं, तर भूतानचा GDP वाढेल. भूतानी लोकांनी आधुनिक जीवनशैली स्वीकारली, तर आरोग्य-सुविधांवर अधिक गुंतवणूक होऊन GDP वाढेल. पर्यावरणाकडे दुर्लक्ष करून विकास केला, तर भूस्खलन, महापूर, रस्ते वाहून जाणं अशा आपत्तींचं प्रमाण वाढेल, नि त्यातून सरकारी खर्च वाढून GDPही वाढेल. पण, अशा साऱ्या कृतींमुळे भूतानी जनतेच्या जीवनावर नकारात्मक परिणाम होईल. तिचा आनंद घटेल.


ह्याउलट, घरातली किंवा समाजातली जी स्वयंसेवी कामं असतात, ती अत्यंत महत्त्वाची असतात; पण ती अर्थार्जनात्मक नसल्यानं GDPमध्ये ती विचारात घेतली जात नाहीत. प्रत्येकाला जीवनात शांत वेळ हवा असतो; सामाजिक सण-समारंभ-उत्सवांत सहभागी होऊन आनंद मिळवायला असतो. GDPमध्ये ह्या बाबींनाही स्थान नाही.'

हे लक्षात घेता, GDP ही मोजपट्टी मानवी आनंद मोजण्याच्या दृष्टीनं अर्थहीन आहे, असं त्यांना वाटलं. त्यातून 'एकूण राष्ट्रीय आनंद' ह्या मोजपट्टीचा जन्म झाला.

महाभारतात म्हटलेलं आहे : 'सुखार्था: सर्वभूतानि मता: सर्वा: प्रवृत्तय:।' सर्व प्राणिमात्रांच्या सर्व कृती 'सुख मिळावं' ह्या हेतूनं प्रेरित असतात. प्रत्येकालाच जीवनात सुख-समाधान-आनंद हवा असतो. संतुलित विकासातून तो प्रत्येकाला मिळेल हे बघणं, हा GNHचा उद्देश आहे. मानव-समाजाच्या अशा संतुलित विकासासाठी भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती ही एकाच वेळी होणं आवश्यक असतं. त्या दोन्ही प्रगती परस्पर-पूरक, परस्पर-बलदायी असायला हव्यात. भौतिक विकास हा आध्यात्मिक विकासाच्या आड येता कामा नये. त्यासाठी भौतिक विकासाचं प्रत्येक अंग, त्यातील बदल ह्यांची सातत्यानं काटेकोर तपासणी, मूल्यमापन व्हायला हवं. GNHची रचना हे करण्यासाठी झालेली आहे. आर्थिक विकासाचा आध्यात्मिक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा विकासांशी सुसंवाद निर्माण करण्याचा तो प्रयत्न आहे. ही अत्यंत मूलभूत प्रक्रिया असल्यानं ती सध्याच्या एखाद्या विशिष्ट समाजापुरती वा राष्ट्रापुरतीही सीमित असू शकत नाही. सर्व समाज, सर्व राष्ट्रं; एवढंच नव्हे, तर भावी पिढ्यांचाही विकास ह्या तऱ्हेनंच व्हायला हवा. किंबहुना, सर्वच सजीवांच्या विकासाचा विचार होणं आवश्यक आणि महत्त्वाचं आहे. बौद्ध विचारांमधली ही एक महत्त्वाची संकल्पना आहे.

एकूणातच, GNHच्या मांडणीवर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव असल्याचं वारंवार जाणवतं. ते तत्त्वज्ञान आणि ती जीवनदृष्टी हा GNHचा पाया आहे. ते तत्त्वज्ञान प्राचीन आहे : भूतानचं वैशिष्ट्य हे की, त्यानं त्या तत्त्वज्ञानातून आधुनिक काळासाठी उपयुक्त अशी विकासनीती साकार केली–राबवली. भौतिक आणि अभौतिक बाबींमध्ये समतोल साधणारी; तसंच आज अत्यावश्यक असणाऱ्या धारणात्मक आणि एकात्म विकासाचं प्रतिमान दृश्यमान करणारी ती नीती आहे.

पाचवे राजे जिग्मे खेसर ह्यांच्या राज्यारोहणाच्या निमित्तानंच GDPचाही शुभारंभ करण्यात आला. त्याच वर्षी भूताननं स्वीकृत केलेली घटना ही 'GNHची उद्दिष्टं साध्य करण्याचं एक साधन' आहे. राजे जिग्मे खेसर ह्यांनी राज्यारोहणाच्या वेळी सांगितलं की, 'GNHविषयी वेगवेगळ्या लोकांच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. माझ्यासाठी GNH म्हणजे मूल्याधारित विकास.'




### ध्येय सामूहिक आनंदाचं

तसं बघायलं गेलं, तर आनंद ही व्यक्तिगत अनुभूतीची बाब आहे. सध्याही 'व्यक्तीनं अधिकाधिक उपभोग घेत अधिकाधिक आनंद प्राप्त करून घ्यावा' असंच धोरण आहे. पण, अशा आनंदात बहुतेकदा एका प्रकारची विकृती सामावलेली असते : इतरांचा विचार न करता स्वार्थीपणानं स्वत: आनंद उपभोगण्याची. आजूबाजूला भुकेले लोक असताना मेजवान्या झोडून स्वत:पुरता 'आनंद' मिळवणारे अनेक जण आपण पाहतो. अनेक लोक अर्धनग्न असताना कपाटांत शेकडो साड्या, शर्ट-पँटी भरून ठेवलेले महाभागही असतात. लाखो लोक झोपड्यांत राहत असताना अत्याधुनिक घरांत चैनीचं जीवन जगणारे 'आनंदी' लोकही काही कमी नाहीत.

GNH अशी भौतिक सुखं, भौतिक आनंद नाकारत नाही; पण, 'तो सर्वांना मिळाला पाहिजे' अशी त्याची भूमिका आहे. भोवताली दु:ख पसरलेलं असताना व्यक्तिगत आनंद असंभव आहे; नि म्हणून आनंद हा सामूहिकच असला पाहिजे असा GNHचा दृष्टिकोण आणि आग्रह आहे. जर सरकारची धोरणं वा एकूणच सामाजिक-आर्थिक स्थिती ही अशा आनंदाला पूरक नसेल, तर जनता आणि देश 'सामूहिक आनंदा'च्या ध्येयापासून दूर राहील. त्यामुळेच, 'राष्ट्रीय धोरण' म्हणूनच अशा आनंदाकडे पाहिलं पाहिजे असं भूतानला वाटतं. सामूहिक आनंदाचा एक भाग म्हणून व्यक्तिगत आनंदाला निश्चितच स्थान आहे. ह्या मुद्द्यावर जनतेला शिक्षित करण्याच्या दृष्टीनं धोरणं आखली जायला हवीत.

'आनंद' ही बऱ्याचदा सापेक्ष गोष्ट असते. इतर लोकांचे उपभोग माझ्यापेक्षा अधिक असतील, तर भरपूर उपभोग घेऊनही मी दु:खी असतो. किंवा, वर्षभरापूर्वी माझ्याकडे अमुक अमुक होतं–आज ते नाही म्हणूनही माणूस दु:खी होतो. आनंदावर नकारात्मक परिणाम घडवणाऱ्या अशा ज्या उपभोगात्मक बाह्य बाबी आहेत, त्यांवरही नियंत्रण असण्याची गरज असते. आनंद कमी करण्याऱ्या ज्या बाह्य बाबी आहेत (उदा. सामाजिक विषमता) त्यांवर नियंत्रण ठेवणं हे सरकारी धोरणांचं महत्त्वाचं ध्येय असायला हवं. त्याचबरोबर, सतत अशी तुलना न करता (इतरांशी वा स्वत:च्या भूतकाळाशी) एक विधायक मानसिकता व्यक्तींच्या मनात निर्माण करण्याचीही गरज असते.

मनाला अशी निरपेक्ष आनंदाची अनुभूती यायची, तर 'उपभोग' ह्या बाबीपासून ते दूर न्यायला लागतं. वर्तनशास्त्रातील काही शाखा असं मानतात की, बाहेरून ज्या तऱ्हेची उत्तेजना मनाला मिळते, तीनुसार त्यात प्रतिसाद निर्माण होतो. ह्या विचाराचा परिणाम असा होतो की, व्यक्तीचा आनंद हा बाह्य वस्तूपासून मिळणाऱ्या उत्तेजनेशीच केवळ जोडलेला राहतो. आनंद म्हणजे इंद्रियांनी घेतलेल्या उपभोगाचा परिणाम. ह्यातून व्यक्ती अधिकाधिक उपभोगांच्या मागे लागतात, ह्यात मग काहीच आश्चर्य नाही.

पण, ह्याच्या बरोबर उलट अशीही एक परंपरा आहे. ती एका वेगळ्याच आनंदस्रोताकडे निर्देश करते : इंद्रियांकरवी मिळणाऱ्या संवेदना बंद करणं आणि मनाची धावपळ शांत करणं. ही प्रक्रिया 'ध्याना'ची आहे. तिथे द्रष्ट्याला स्वत:चीच अनुभूती येते. दीर्घकाळ ध्यान करण्याऱ्या मेंदूतल्या संवेदनापथांतच (neural pathways) बदल होऊन शांतपणा आणि अल्पसंतुष्टता हेच व्यक्तिमत्त्व बनून जातं. मनाला असा आत आनंद शोधण्याचं प्रशिक्षण दिलं जाऊ शकतं. ह्यातून बाह्य वस्तूंवरचं, उपभोगावरचं अवलंबित्व कमी होत जातं.

जेव्हा असा सांस्कृतिक दृष्टिकोण निर्माण होतो, तेव्हाच स्थायी आणि धारणाक्षम अर्थव्यवस्था प्रत्यक्षात येऊ शकते. अर्थव्यवस्था अ-धारणाक्षम वेगानं सतत वाढत राहते ह्याचा सरळसरळ अर्थ हाच की, ती व्यक्तींना त्यांच्या सतत वाढत राहणाऱ्या हावेपासून दूर ठेवण्यात अपयशी ठरली आहे. GNH आणि GDP ह्यांवर आधारित अर्थव्यवस्था ह्या अनुक्रमे ह्या दोन दृष्टिकोणांवर आधारित आहेत.

GNH हा व्यक्तींना 'सर्व गोष्टी परस्परपूरक आहेत' ह्या दृष्टीनं बघायला प्रवृत्त करतो. सामूहिक आनंद प्रत्यक्षात येण्यासाठी हा दृष्टिकोण अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक जण आपल्या व्यक्तिगत स्वार्थाच्या वर उठणं हे सामूहिक आनंदासाठी आवश्यक आहे. इतरांचीही आनंदी असण्याची गरज लक्षात न घेता जो आनंद मिळवला जातो, तो स्वार्थी आणि बेजबाबदार असतो. अशा आनंदाचा पाठलाग अनैतिक असण्याचीच शक्यता अधिक असते. नाती दृढ होण्यातूनच आनंद अधिकाधिक फुलत असतो. विकास म्हणजे व्यक्तीच्या नातेसंबंधांचा विकास.

### आवश्यकता निर्देशांकाची

'आनंद' ही जर व्यक्तिगत व सामूहिक अनुभूतीची बाब असेल, तर ती एखाद्या निर्देशांकाच्या आधारे कशी काय गोचर करता येईल? ते शक्य आहे का? मुळात, ते आवश्यक आहे का?

—जोवर आनंद ही अनुभूतीपुरती मर्यादित गोष्ट असते, तोवर ती संख्यायित (quantify) करण्याची गरज नसते. पण, जेव्हा त्याच्या आधारे काही धोरणं आखायची असतात; सामाजिक जीवनाला दिशा द्यायची असते, तेव्हा संख्यात्मक आधार आवश्यक असतो. GNHकरता जे विविध निर्देशक (indicators) तयार करण्यात आले आहेत, त्यांमागे हा विचार आहे.

आज जगात विकासाचे जे मुख्यप्रवाही निर्देशांक आहेत, ते प्राय: बाजारपेठेशी संलग्न आहेत : बाजारपेठेतील व्यवहार, व्यापार, आर्थिक देवाणघेवाण, शेअर बाजार, आर्थिक वाढ, इत्यादि. GDPशी निगडित असलेले हे पारंपरिक निर्देशांक हे समाजाच्या भौतिक उत्पादनाचं चित्र स्पष्ट करणारे असतात. GDPचा कल हा उत्पादनवाढ आणि उपभोगवाढ ह्यांकडे कमालीचा झुकलेला आहे. त्या वाढीची आवश्यकता किंवा वांछनीयता तो विचारांत घेत नाही. एकात्म निकष नाकारून हा एकांगी निकषच पुढे रेटला जातो. 'किती संसाधनं शिल्लक आहेत' ह्याची त्यात दखल घेतली जात नसल्यानं GDP हा संधारणविरोधी आहे.

निर्देशक हा धोरणांना दिशा देतो. GDPच्या सार्वत्रिक वापरामुळे सर्व देशांची धोरणं ही गतिमान भौतिक विकासाला पूरक अशी आखली गेली आहेत : त्यांचं समर्थन करणारी आहेत. सामाजिक दृढता, सांस्कृतिक वैविध्य आणि पर्यावरणाची जपणूक ह्यांचा विचारच त्यामुळे त्या धोरणांत नसतो.

निर्देशक हे मूल्ययुक्त असतात. ते विशिष्ट मूल्यांचं प्रतिनिधित्व करतात. GDP हे विशिष्ट मूल्यांचं प्रतीक आहे. त्या निर्देशांकाचा वापर 'सर्वजणच करतात' म्हणून तो इतरांकडूनही प्राय: अनवधानानंच

*'विकास' ह्या विषयावर जन्मभर काम करणाऱ्या विद्वानांच्याही आवाक्यात न आलेली विकासाची एक व्यापक, समावेशक संकल्पना १७ वर्षांच्या एका युवकानं मांडली!*

*भोवताली दु:ख पसरलेलं असताना व्यक्तिगत आनंद असंभव आहे; नि म्हणून आनंद हा सामूहिकच असला पाहिजे असा GNHचा दृष्टिकोण आणि आग्रह आहे.*

केला जातो; तथापि त्यामागची मूल्यं तीच राहतात. ह्याउलट, GNH-निर्देशकांचा वापर करण्यातून GNH-मूल्यं व्यक्त होतात.

मूल्यं आणि धोरणं-कार्यक्रम ह्यांना जोडण्याचं काम निर्देशकांच्या माध्यमातून होतं. देशाला, समाजाला विशिष्ट दिशेत पुढे नेण्यासाठीही निर्देशकांचा उपयोग होतो. विकास ज्या मूल्यांवर आधारित हवा, त्यांची माहिती निर्देशकांमधून होते.

निर्देशकांमुळे ध्येयाला एका प्रकारची वास्तवता प्राप्त होते. आपल्याला नेमकं कोणतं उद्दिष्ट गाठायचं आहे ह्याचा अंदाज येतो. GNH हा जर फक्त तत्त्वज्ञानाच्या किंवा दृष्टीच्या पातळीवरच राहिला, तर ठाशीव ध्येयाअभावी प्रत्यक्षातले कार्यक्रम आखणं, त्यासाठीच्या विविध घटकांचं नियोजन वा आपूर्ती करणं हे अशक्य होऊन बसेल. उदाहरणार्थ, 'पर्यावरणाची जपणूक करावी' हे तत्त्व. त्यातून, व्यवहारात नेमकं काय करायचं हे कळत नाही. पण, 'अमुक इतकं क्षेत्र जंगलांनी व्यापलेलं हवं'; 'वृक्षतोड अमुक इतक्या प्रमाणातच करता येईल'; 'पुनर्लागवड अमुक इतक्या प्रमाणात करायला हवी आहे' हे आकडे समोर ठेवले की, ते तत्त्व प्रत्यक्षात उतरवणं सरकारला आणि लोकांनाही सोपं होतं. अमूर्त तत्त्वाचं सामूहिक ध्येयात रूपांतर होण्यासाठी मूर्त निर्देशकांची गरज असते. ह्या दृष्टीनं धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी 'भूतान-अध्ययन-केंद्रा'नं काही चाळण्या (screening tools) तयार केल्या आहेत. ठरवलेलं उद्दिष्ट किती गाठलं गेलं आहे ह्याचं मूल्यमापन करण्यासाठी सरकारलाही निर्देशकांचा उपयोग होतो; आणि लोकही त्या आधारे सरकारला जाब विचारू शकतात.

*अर्थव्यवस्था अ-धारणाक्षम वेगानं सतत वाढत राहते ह्याचा सरळसरळ अर्थ हाच की, ती व्यक्तींना त्यांच्या सतत वाढत राहणाऱ्या हावेपासून दूर ठेवण्यात अपयशी ठरली आहे.*

जनता एकदा अशा निर्देशकांशी परिचित झाली की, तिची ग्राहकीय वा नागरिकीय वर्तणूक घडण्या-बदलण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ शकतो. कशा तऱ्हेच्या वागणुकीमुळे एखादं ध्येय गाठण्यात अडचणी येत आहेत; तीत कसा बदल केला तर समस्यांचा उद्भव थांबेल वा त्या सुटू शकतील हे सारं निर्देशक बघून ठरवता येऊ शकतं. ह्या दृष्टीनं, वर्तन-परिवर्तनाचं साधन म्हणून निर्देशकांचा उपयोग होतो.

GNH-निर्देशकांमध्ये वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ अशा दोन्ही आयामांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, गुन्हेगारीविषयक वस्तुनिष्ठ आकडेवारी जशी विचारात घेतली जाते, तसंच 'व्यक्तींना एकूणात सुरक्षित वाटतं का' ह्याचाही व्यक्तिनिष्ठ विचार होतो. एखादी शाळा ही विद्यार्थ्यांचं उत्तीर्णाचं प्रमाण, दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक सोयी-सुविधा, उपक्रम अशा परिमेय बाबींत सांख्यिकीय स्तरावर खूप चांगली कामगिरी दाखवत असेल. पण, तिथल्या विद्यार्थ्यांना अशा शिक्षणाविषयी काय वाटतं, हेही महत्त्वाचं असतं. शिक्षक धाक-दपटशाचा वापर करत असतील; अतिरेकी स्पर्धेचा ताण मुलांच्या मनावर येत असेल, तर मग त्यांना शिक्षण ही प्रक्रिया आनंददायी वाटणार नाही. त्यामुळे वस्तुनिष्ठ आकडेवारीबरोबरच अशी व्यक्तिनिष्ठ मतंही महत्त्वाची ठरतात.

निर्देशकांची आकडेवारी ही नियोजनकर्त्यांना 'प्रतिसाद' (feed back) म्हणून उपयोगी पडते. अमुक एक धोरण किती प्रभावी आहे, हे कळू शकतं. धोरणांत बदल करता येऊ शकतात. मूल्यं आणि धोरणं ह्यांत सुसंवाद निर्माण करता येऊ शकतो.

हे जर समाधानकारकपणे करता आलं, तर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि नैसर्गिक अशा सर्वच पर्यावरणांमध्ये GNH-मूल्यांचा शिरकाव होऊन सुसंवादी, परस्परपूरक राष्ट्रीय धोरण तयार होऊ शकेल. ही सर्व पर्यावरणं वेगवेगळी नसून परस्परांमध्ये गुंतलेली आहेत, नि म्हणून समान पायाभूत मूल्यांच्या आधारेच त्यांच्या बाबतीतली धोरणं/कार्यक्रम निश्चित होणं हे आवश्यक आहे. बौद्ध तत्त्वज्ञान हे सदैवच सगळ्याच्या परस्पर-संबद्धतेविषयी सांगतं, नि म्हणूनच निर्देशकांची विशिष्ट हेतूनं रचना करून सर्व सजीव सृष्टीच्याच एकात्म विकासाचे प्रयत्न व्हायला हवेत. GNH हा असा एक प्रयत्न आहे.



* * *

समाधानाचं सर्व बाजूंनी परीक्षण करता यावं म्हणून मोठ्या संख्येनं निर्देशक तयार केले गेले आहेत. केवळ एकाच व्यक्तिनिष्ठ वा वस्तुनिष्ठ निर्देशकानं काम भागलं नसतं का? उदाहरणार्थ, 'सर्व परिस्थिती विचारात घेता तुम्ही (अ) अत्यंत समाधानी आहात; (आ) थोडेसेच समाधानी आहात; (इ) असमाधानी आहात; की (ई) सांगता येणार नाही' अशा एका व्यक्तिनिष्ठ प्रश्नाच्या आधारे GNH ठरवता आला नसता का? किंवा, 'तुमची समाधानाची पातळी १ ते १० ह्या मोजपट्टीवर नोंदवा' असं एकच वस्तुनिष्ठ मोजमाप करून भागलं नसतं का?' —ह्या प्रश्नांना भूतानचं उत्तर 'नाही' असं आहे. जीवनाशी निगडित असंख्य बाबी असतात, नि प्रत्येकीच्या बाबतीतली समाधानाची पातळी वेगवेगळी असू शकते. त्यामुळे त्या प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र निर्देशक हवा; जेणेकरून असमाधानाच्या त्या नेमक्या बाबींविषयी उपाययोजना करणं शक्य होईल.

## GNHची रचना

GNHचे ४ आधारस्तंभ ह्याप्रमाणे आहेत :

* **समन्यायी आणि धारणाक्षम सामाजिक-आर्थिक विकास** : शिक्षण, आरोग्य, शेती आणि विविध आर्थिक उद्योग हे ह्या दृष्टीनं कार्य करतात. भूतानची दुर्गम भौगोलिक रचना आणि विखुरलेली विरळ लोकसंख्या हे दोन्ही गृहीत धरूनही सामाजिक-आर्थिक विकासाचे संख्यात्मक आणि गुणात्मक लाभ सर्वांपर्यंत पोचवण्याचं भूतानचं धोरण आहे. राष्ट्रीय गुंतवणुकीचा आणि अर्थार्जनाचा उद्योग म्हणून 'जलविद्युत्' हे क्षेत्र निश्चित करण्यात आलं आहे. खनन, किंवा वनांचा संहार करणाऱ्या अ-धारणाक्षम उद्योगांना नकार देण्यात आलेला आहे. पर्यटनही धारणाक्षम असण्यावर कटाक्ष आहे.

* **संस्कृतीचं रक्षण आणि संवर्धन** : व्यक्तींची नैतिक घडण आणि कृती ह्या बाबी संस्कृतीच्या द्वारे ठरत असतात. त्यामुळे ह्या स्तंभाचा उद्देश कुटुंब आणि समाज ह्या संस्था बळकट करण्याचा आहे. स्वयंसेवी कार्य, सहिष्णुता, सहकार्य, करुणा, साधेपणा, आदरभाव, प्रतिष्ठा अशा उदात्त भाव-भावनांना प्रोत्साहन देणं असाही त्यामागचा उद्देश आहे. ह्याचं दृश्य रूप म्हणजे भूतानमधील गुन्ह्यांचं अत्यंत कमी प्रमाण.

व्यक्ती आणि समाजांच्या मानसिक आणि भावनिक गरजा भागवण्याचं काम संस्कृती करते. म्हणून स्थानिक किंवा प्रादेशिक उत्सवांच्या निमित्तांनी सामाजिक संबंध निर्माण आणि दृढ करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न भूतान सरकारकडून केले जातात. समाज हा बृहद् परिवार असणं ही भूतानची एक मोठीच जमेची बाजू आहे. कुटुंबांचं विघटन होऊ नये, किंवा परस्परांशी संबंध नसणारी छोटी कुटुंबं निर्माण होऊ नयेत, ह्या दृष्टीनं परंपरा आणि चालीरीतींची जपणूक वा पुनरुज्जीवन करण्याचे सजग प्रयत्न भूतानचं सरकार करतं.

* **पर्यावरणाची जपणूक** : भूतानचं पर्यावरणविषयक धोरण हे बौद्ध विचारांवर आधारलेलं आहे : माणूस आणि निसर्ग हे केवळ परस्परपूरकच नव्हेत, तर अविभाज्य घटक आहेत. ह्या दृष्टिकोणानुसार निसर्ग हा जीवनदाता, अन्नदाता, सुखदाता आहे. ते कोट्यवधी सजीवांचं घर आहे. त्यामुळे निसर्गाची जपणूक हे भूतान सरकारचं प्राधान्याचं धोरण आहे. त्यानुसार सध्या भूतानमध्ये ६४% भूभाग घनदाट जंगलांनी व्यापलेला आहे. पैकी २६% भाग ही संरक्षित वन्यजीव-क्षेत्रं आहेत. 'किमान ६०% भूभाग कायम वनाच्छादित हवा' असा सरकारनं निर्णयच केलेला आहे. आर्थिक वाढीचं आक्रमण वनांवर होणार नाही, ह्याची ह्यातून काळजी घेतलेली आहे.

* **सुप्रशासन** : सामूहिक आनंदाचं ध्येय प्रत्यक्षात उतरायचं, तर सुप्रशासन ही आवश्यक बाब आहे. लोकांनी आपल्यासाठीचे निर्णय स्वत:च घ्यावेत ह्या दृष्टीनं १९८१मध्ये जिल्हा-प्रशासनाला विकास-कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचं दायित्व देण्यात आलं; तर १९९१मध्ये गट स्तरावर विकास-समित्यांची उभारणी करण्यात आली. १९९८मध्ये नव्या मंत्रिमंडळाची नेमणूक झाली; तर २००८मध्ये घटना तयार होऊन ह्या राजसत्ताकाचं रूपांतर प्रजासत्ताकात झालं.

## निर्देशकांची निश्चिती

GNH ह्या संकल्पनेला मूर्त आणि वास्तव रूप देण्यासाठी आणि अन्यही कारणांसाठी निर्देशकांची आवश्यकता का होती, हे आपण वर पाहिलं. हे निर्देशक निश्चित करण्याच्या दृष्टीनं २००६ ते ८ ह्या काळात २० पैकी १२ जिल्ह्यांत दोनदा व्यापक सर्वेक्षणं करण्यात आली. प्राथमिक सर्वेक्षणात एका मुलाखतीसाठी ७ ते ८ तास वेळ लागत होता. तो खूपच जास्त असल्यानं दुसऱ्या सर्वेक्षणासाठी प्रश्नावली निम्मी (१८८ प्रश्न) करण्यात आली. त्यांतून पुढे आलेलं चित्र असं :

| समाधानाची पातळी | शहरी भाग,% | ग्रामीण भाग,% | सरासरी, % |
|---|---|---|---|
| अतिशय समा. | ४२.० | ४६.५ | ४५.२ |
| समाधानी | ५५.३ | ४९.९ | ५१.६ |
| असमाधानी | २.७ | ३.५ | ३.२ |

अन्य निकषांनुसार जे निष्कर्ष मिळाले आहेत, त्यांच्याशी ही आकडेवारी सुसंगतच आहे. Happy Planet Indexच्या अनुसार भूतानातील समाधानाची पातळी ही जगातल्या सर्वाधिक आनंदी १०% देशांइतकी आहे. समान दरडोई-GDP असणाऱ्या अन्य देशांपेक्षा ती निश्चितच अधिक आहे. दक्षिण आशियातला तो सर्वाधिक आनंदी, समाधानी देश आहे; तर, जगातल्या १७८ देशांत त्याचा क्रमांक १३वा लागतो!

ह्या सर्वेक्षणांनंतर वरील ४ आधारस्तंभांचं ९ आयामांमध्ये विभाजन करण्यात आलं. त्या प्रत्येकाला समान महत्त्व देण्यात आलेलं आहे, कारण GNHचे भाग म्हणून त्यांना समान महत्त्व आहे. ह्या प्रत्येक आयामाच्या मोजमापासाठीचे निर्देशक निश्चित करण्यात आले आहेत. हे आयाम आणि त्यांची सविस्तर माहिती अशी :

**(१) मानसिक स्वास्थ्य** : लोक आपल्या जीवनाकडे कसं बघतात; अवतीभोवतीची परिस्थिती त्यांना एकूणात कशी वाटते, हे ह्या अंतर्गत मोजलं जातं. सामाजिक स्थितीविषयीचे प्रचलित निकष हे गुन्ह्यांचं प्रमाण, घटस्फोटांचं प्रमाण, बालमृत्यूचा दर, लैंगिक विषमता, इ.विषयी माहिती देतात. तथापि, त्यांतून व्यक्तिनिष्ठ माहिती मिळत नाही : नात्यांचा दर्जा, एकटेपणा वा नैराश्य जाणवणं, भावनांवरचं नियंत्रण, इत्यादि.

मानसिक स्वास्थ्य हे शारीरिक स्थास्थ्यावरही सुपरिणाम करतं. इतकंच नव्हे; तर आर्थिक वाढीसाठीही ते आवश्यक असतं. एका अभ्यासानुसार मानसिक स्वास्थ्य चांगलं असणारे लोक कामं चांगल्या प्रकारे करतात, नि जास्त कमाईही करतात. जर समाजाचं लक्ष सातत्यानं अधिक उपभोग–अधिक उत्पादन ह्यांकडे वेधलं गेलं, तर तीच सामाजिक ध्येयं बनून जातात. म्हणूनच भूताननं मानसिक स्वास्थ्याकडे अधिक लक्ष वेधण्याचं ठरवलं आहे.

ह्या अंतर्गत असणारे निर्देशक असे : सर्वसाधारण मानसिक अस्वास्थ्याचं प्रमाण; मनातील सकारात्मक (उदा. शांतपणा, करुणा, औदार्य, इ.) आणि नकारात्मक (उदा. स्वार्थीपणा, वैफल्य, असूया, इ.) भावनांचं संतुलन; आध्यात्मिक स्वरूपाच्या कृती (प्रार्थना, ध्यान, इ.); तसंच आपल्या कर्मांच्या विपाकाकडे लक्ष असणं.

**(२) वेळेचा उपयोग** : व्यक्तीच्या जीवनाची गुणवत्ता ही ती तिच्या २४ तासांचा उपयोग कसा करते ह्यावर अवलंबून असते. तिच्या जीवनात उपजीविकेसाठीचं काम आणि त्या व्यतिरिक्तची कामं ह्यांत संतुलन आहे की नाही, हे ती वेळेचा उपयोग कसा करते ह्याच्या मोजमापावरून समजतं. थोडक्यात, वेळेच्या उपयोगाची पद्धत आणि जीवनाची गुणवत्ता ह्यांचा थेट संबंध आहे.

GDPच्या संकल्पनेत उत्पादनाच्या/अर्थार्जनाच्या कामासाठी दिला जाणारा वेळ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. (कारण, त्याचा थेट संबंध GDP वाढण्याशी आहे.) त्यामुळे माणसं १२-१४-१६ तास मरमर काम करत राहतात. गंमत म्हणजे, मिळालेला पैसा उपभोगायलाही त्यांना वेळ मिळत नाही. असे लोक समाधानी, आनंदी तर नसतातच; उलट, अधिक तणावग्रस्त असतात. तीच गोष्ट उपलब्ध वेळेचा जास्तीत जास्त उपयोग करू पाहणाऱ्यांची. असे लोकही सततच्या धावपळ-दगदगीमुळे तणावग्रस्त असतात. अशा वेळी, शांत बसणं, झोप ह्यांसाठी किती वेळ दिला जातो ह्याचं मोजमाप आवश्यक ठरतं.

दुसरीकडे, चांगल्या जीवनासाठी आवश्यक आहेत अशी बरीच कामं 'अनुत्पादक' किंवा 'अनार्थिक' स्वरूपाची असल्यानं त्यांची GDPमध्ये दखलच घेतली जात नाही. घरातली कामं, मुलांचं संगोपन/सांभाळ, रुग्ण आणि वृद्धांची काळजी घेणं, समाजातल्या गरजूंकडे लक्ष देणं, स्वयंसेवी सामाजिक कार्य... अशी कामं अत्यंत महत्त्वाची आणि आवश्यक असतात; पण, ती हिशेबातच घेतली जात नाहीत. GNH मध्ये त्यांचाही विचार होतो; कारण व्यक्तीच्या वा समाजाच्या (उदा. रुग्ण, अपंग वा वृद्ध व्यक्ती) समाधानात त्यांचं मोठंच योगदान असतं.

सामाजिक संबंध, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, पर्यटन अशा वैविध्यपूर्ण कामांसाठी वेळ देण्यातून वैयक्तिक आणि सामाजिक जीवन समृद्धच होत असतं, आणि समाधानाची पातळी उंचावतच असते.

काही जणांना कामधंदाच नाही म्हणून रिकामपणात/टीव्ही पाहण्यात वेळ घालवावा लागत असेल, तर सरकारला त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी काही तरी करावं लागेल.

'वेळेचा उपयोग' मोजताना अशा सर्व कामांसाठी व्यक्ती किती किती वेळ देते, नि विश्रांतीसाठी किती वेळ देते हे मोजलं जातं.

**(३) सामाजिक दृढता** : व्यक्तीची आर्थिक/भौतिक उन्नती हेच ध्येय ठेवल्यामुळे समाज ह्या घटकाकडे सध्या कमालीचं दुर्लक्ष होत आहे. कित्येकदा तर समाजाच्या जिवावर, किंवा समाजाचा बळी देऊनही व्यक्ती मोठ्या बनताना दिसतात. प्रारंभी 'व्यक्ती जिंकतात' असं वाटलं, तरी अंतिमत: समाजाच्या हारीत व्यक्तींची हारच सामावलेली असते. म्हणूनच GNHमधला 'सामाजिक दृढते'चा हा आयाम. त्या अंतर्गत निरपेक्ष सामाजिक कार्य, सामाजिक एकोपा आणि समानुभूती, सामाजिक सुरक्षितता, कौटुंबिक संबंध आणि सुरक्षितता, निरपेक्ष दान, सामाजिक संबंधांसाठी दिला जाणारा वेळ अशा मुद्द्यांचा विचार होतो.

ह्या अंतर्गत असणारे ७ निर्देशक असे : कौटुंबिक दृढता; सुरक्षितता; पारस्परिकता; विश्वास; सामाजिक आधार; सामाजिकीकरण आणि दृढ नात्यांचं प्रमाण.

*बौद्ध तत्त्वज्ञान हे सदैवच सगळ्याच्या परस्पर-संबद्धतेविषयी सांगतं, नि म्हणूनच निर्देशकांची विशिष्ट हेतूनं रचना करून सर्व सजीव सृष्टीच्याच एकात्म विकासाचे प्रयत्न व्हायला हवेत. GNH हा असा एक प्रयत्न आहे.*

**(४) सांस्कृतिक वैविध्य** : आपल्या सांस्कृतिक परंपरेचं रक्षण हे भूतानच्या धोरणाचं एक महत्त्वाचं ध्येय आहे. संस्कृती आणि परंपरांचं वैविध्य हे समाजाला ओळख, मूल्यं आणि सर्जनशीलता देतं. हा आयाम सांस्कृतिक उपक्रमांची संख्या आणि स्वरूप; भाषा/बोलींची विविधता, आणि उत्सव-परंपरांतला लोकांचा सहभाग ह्या बाबींकडे लक्ष देतो.

ह्या अंतर्गत असणारे ६ निर्देशक असे : सामाजिक उत्सव; मौलिक शिकवण; मूल्य-संक्रमण; भाषेचा वापर; पारंपरिक खेळ आणि कारागिरांचं कौशल्य.

**(५) स्वास्थ्य** : स्वास्थ्य आणि आनंद ह्यांचा खूप जवळचा संबंध आहे. मानसिक स्वास्थ्याचा स्वतंत्र विचार केलेला असल्यानं ह्या आयामाअंतर्गत शारीरिक स्वास्थ्य आणि चिकित्सा-सुविधा ह्यांविषयीची माहिती संकलित केली जाते. लोकांना स्वत:च्या स्वास्थ्याविषयी काय वाटतं; उंची-वजन गुणोत्तर;

अपंगता; महिन्यातील निरोगी दिवस; स्तनपान-एड्स् इ. विषयीची माहिती, अशा मुद्द्यांचा तीत समावेश असतो. पाश्चात्त्य/पारंपरिक चिकित्सा-सुविधा चालत किती अंतरावर आहेत; चिकित्सा मिळण्यातील अडचणी अशा व्यवस्थागत मुद्द्यांचाही ह्या निर्देशकांत समावेश आहे.

**(६) शिक्षण** : शिक्षणातून माहिती, मूल्यं, कौशल्यं, नागरिकत्वाची जाणीव, सर्जनशीलता अशा अनेक बाबी मिळतात. त्यांचा विचार तर ह्या आयामात होतोच; पण, त्याहूनही अधिक हे बघितलं जातं की, शिक्षणातून सामूहिक समाधानाकडची वाटचाल होते आहे की नाही. ह्या अंतर्गत असू शकणारे निकष खूप आहेत; पण फक्त ३ निकषांचाच समावेश GNHसाठी केलेला आहे : साक्षरतेची पातळी; जिल्ह्यातील भाषेची स्थिती, आणि इतिहास व लोक ह्यांविषयीची माहिती.

तथापि, ह्या औपचारिक माहितीच्या वा शिक्षणाच्या पलीकडे जाऊन भूतान असं मानतो की, प्रत्येक घर-झोपडी हे एक विशेष प्रकारचं विद्यापीठच आहे; जिथे नम्रता आणि सहिष्णुता, स्नेह आणि करुणा, परस्परांची काळजी घेणं, कर्म आणि त्यांचे परिणाम, साधेपणा, मानवता ह्या शाश्वत मूल्यांचे धडे मिळतात. औपचारिक शिक्षणाइतकंच त्यांनाही महत्त्व दिलं जातं.

**(७) पार्यावरणिक वैविध्य** : भूतान हा समृद्ध पर्यावरण असणारा देश आहे. सर्व शेती नैसर्गिक/सेंद्रिय पद्धतीची; उद्योगीकरण वा आधुनिकीकरण फारसं नाहीच; अन् वाहतूक अत्यंत कमी. अशा परिस्थितीमुळे भूतानचं हिमालयीन पर्यावरण अनाघ्रात राहिलेलं आहे. वनं टिकून आहेत; जमिनीचा कस टिकून आहे; हवा-पाणी अप्रदूषित आहे. हे असं टिकवून ठेवणं हे भूतानचं प्राधान्याचं धोरण आहे. GDP-वाढीच्या मागे देश लागला की पर्यावरणाचा विनाश ठरलेलाच असतो; म्हणूनच भूताननं GNHमध्ये पर्यावरणाचं वैविध्य, सुस्थिती टिकवण्याला महत्त्व दिलेलं आहे. राष्ट्रीय गरजा आणि पुरवठा ह्यांचा पर्यावरणावर न्यूनतम आघात व्हावा असा त्याचा प्रयत्न असतो.

*चांगल्या जीवनासाठी आवश्यक आहेत अशी बरीच कामं 'अनुत्पादक' किंवा 'अनार्थिक' स्वरूपाची असल्यानं त्यांची GDPमध्ये दखलच घेतली जात नाही. GNHमध्ये त्यांचाही विचार होतो.*

पर्यावरणासंबंधीचे बरेच मुद्दे अन्यान्य विभागांच्या कक्षेत येत असल्यानं GNHसाठी ३ निकषांवरचीच माहिती गोळा करण्यात येते : पर्यावरणाची हानी; पर्यावरणविषयक जाणीव आणि पुनर्वनीकरण.

**(८) जीवनस्तर** : 'आर्थिक उत्पन्न अधिक असेल, तर व्यक्ती अधिक आनंदी/समाधानी असते' हे एका मर्यादेपर्यंतच सत्य आहे. भूतानी लोक फारसे श्रीमंत नसूनही अधिक समाधानी आहेत; कारण समाधानासाठी पैशांइतकीच स्वास्थ्य, करमणूक, शेजारपाजाऱ्यांची मदत, देवाणघेवाण, दान अशा अनार्थिक बाबीही महत्त्वाच्या असतात.

ह्या आयामाअंतर्गत व्यक्तींचं/कुटुंबाचं उत्पन्न, आर्थिक सुरक्षितता, माणसं/खोल्या गुणोत्तर, अन्नसुरक्षा, घराची मालकी अशा बाबी विचारार्थ घेतल्या जातात. काही अक्षमतांचीही माहिती नोंदवली जाते : घर दुरुस्तीसाठी पुरेसे पैसे नसणं; सामाजिक उत्सवांसाठी वर्गणी देता न येणं; जुने कपडेच विकत घ्यावे लागणं, इत्यादी.

४ निर्देशकांच्या आधारे वरील प्राचल मोजले जातात : आर्थिक उत्पन्न; घर; अन्नसुरक्षा आणि अक्षमता.

**(९) सुप्रशासन** : ह्याचे अनेक पैलू आहेत : प्रशासनाची परिणामकारकता, नियमनक्षमता, कायदेपालन, भ्रष्टाचारावर नियंत्रण, जनतेप्रति उत्तरदायित्व, पारदर्शकता, जनसहभाग, इत्यादि. भूतानच्या विविध राजांनी ह्या दृष्टीनं पूर्वीपासूनच पावलं टाकलेली आहेत. आता तर घटनेतच 'GNHची परिणामकारक अंमलबजावणी' हे सरकार/प्रशासनाचं कर्तव्य असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. GNHची शास्त्रीय रचना होण्यापूर्वीपासूनच चौथ्या राजांनी अनेक जनहितकारी योजना सुरू केल्या आहेत : सर्वांना विनामूल्य शिक्षण व आरोग्यसुविधा; अधोसंरचनेची उभारणी; पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा; घरांसाठी लाकडांचा विनामूल्य पुरवठा; गरजूंना मोफत जमीन, इत्यादि.

प्रशासन हे सर्व करत असताना जनतेला त्याच्याविषयी काय वाटतं हे ह्या आयामाच्या निर्देशकांद्वारे जाणून घेतलं जातं. विविध विभागांची कार्यक्षमता, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता; जनतेचा माध्यमं, पोलीस आणि न्यायव्यवस्थेवरचा विश्वास; मानवी हक्कांची जपणूक; विविध स्तरांवरचं नेतृत्व अशा बाबींतली मतं नोंदवली जातात. निर्देशक आहेत : सरकारच्या कामाचं मूल्यमापन; स्वातंत्र्य; आणि विविध संस्थांवरचा विश्वास.

वरील ९ आयामांच्या अंतर्गत GNHचं मोजमाप करताना त्यांचे ३८ उपविभाग करण्यात आले आहेत. ७२ निर्देशकांच्या अंतर्गत १५१ प्राचल आहेत.

ह्यातून जो GNH-निर्देशांक मिळतो, तो '० ते १' ह्यामधला अंक असतो. अंक मोठा तितकं चांगलं. किती प्रतिशत भूतानीय पूर्णत: समाधानी आहेत; आणि जे पूर्ण समाधानी नाहीत, ते वरील ९ पैकी किती आयामांच्या बाबतीत समाधानी आहेत, ह्या दोनांच्या आधारे GNH-निर्देशांक ठरवला जातो. भूतान-अध्ययन-केंद्र आणि GNH-आयोग ह्या संस्था हे सर्व काम करतात.

ही सर्व प्रक्रिया १९७०च्या दशकापासून हळूहळू विकसित होत गेली आहे. चौथे राजे जिग्मे सिंग्ये ह्यांच्या काळातच GNHशी सुसंगत कायदे आणि धोरणं तयार करून पथनिश्चिती करण्यात आली. २००८मध्ये स्वीकारलेल्या घटनेनं GNH हे राष्ट्रीय ध्येय आणि धोरण म्हणून नमूद केलेलं आहे.

## भूतानची वाटचाल

GNHमधील तत्त्वांची शब्दश: आणि भावश: अंमलबजावणी करत भूताननं आपली धोरणं त्यानुसार निश्चित केली आहेत. त्यांचा हा धावता आढावा :

*शेती* : भूतानमधली शेती ही उपजीविकेपुरतीच आहे. लोक गरीब असतील; पण, कुणीही उपाशी नाही. संपूर्ण देशच हिमालयीन असल्यानं सपाटी फार कमी आहे. शेती प्राय: श्रमाधारित आहे. बहुतेकशी शेती ही 'सेंद्रिय' आहे. मात्र, वनांचं प्रमाण मोठं राखल्यानं शेतीला होणारा वन्यपशूंचा (उदा. रानडुकरं) त्रासही अधिक आहे. पण, सरकार वनरक्षणाच्या धोरणांशी ठाम आहे.

*वनं* : वनसंरक्षणाच्या धोरणाचा उल्लेख ह्यापूर्वीही आलेला आहे. समुद्रसपाटीपासून १५० ते ३४०० मीटर उंची असलेला हा देश उपविषुववृत्तीय, समशीतोष्ण आणि हिमालयीय वनांनी समृद्ध आहे. किमान ६०% भूभाग वनाच्छादित राखण्यास कटिबद्ध असलेल्या भूतानमध्ये, असंरक्षित वनांतही वृक्षतोड आणि काष्ठेतर वनोपजांच्या संकलनावर कडक बंधनं आहेत. जलवीज, पर्यटन आणि शेती ह्या तीन आर्थिक आधारस्तंभांचा मूळ आधार वनं हा आहे; त्यामुळे हे निर्बंध. हिमालयीय भूरचनेतलं वनांचं स्थान कळीचं आहे; अन्यथा भूतानचा उत्तराखंड होईल! भूतान सरकार १९७९पासूनच जनतेला वनीकरण-कार्यक्रमांत सहभागी करून घेत आलं आहे. अशा सामूहिक वनांमध्ये प्रत्येक कुटुंबाला २॥ हेक्टर वनक्षेत्र दिलं जातं : त्यानं ते राखायचं, नि योग्य परवानगी घेऊन काष्ठ आणि गवती चहा-गूजबेरीसारखी काष्ठेतर वनोपजं विकून पैसेही कमवायचे. ह्यातून अनधिकृत वृक्षतोड कमी होण्याची सरकारला आशा आहे.

*पर्यटन* : भूतान हा पर्यटकांचा स्वर्ग आहे. मात्र, त्यातून खोऱ्यानं पैसा ओढून पर्यावरण, संस्कृती आणि विशिष्टता उद्ध्वस्त करण्याला भूतानचा विरोध आहे. त्यामुळे, उत्पन्नवाढीसाठी पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचं सरकारचं धोरण असलं, तरी पर्यटन हे पर्यावरणाशी स्नेहपूर्ण, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या स्वीकारार्ह, आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारं असलं पाहिजे, ह्यावर भूतानचा कटाक्ष आहे. म्हणूनच त्याची पर्यटन-नीती ही 'high val}–low impact' अशी आहे. पर्यटकांची संख्या मर्यादित ठेवण्यासाठी प्रतिदिन ६५ डॉलर इतका घसघशीत कर दरडोई आकारला जातो. शिवाय त्यावर २% सरकारी कर, नि भरीला १० डॉलर 'पर्यटन-विकास-निधी'साठी द्यावे लागतात. भूतानमध्ये प्रवेशण्यासाठी फक्त १ आंतरराष्ट्रीय विमानतळ पारो इथे आहे, नि तिथे फक्त 'ड्रुक एअर' ह्या भूतानी कंपनीचीच विमानं चढउतार करतात. इतकं करूनही (राजधानी) थिंफू आणि पारो ह्या दोन जिल्ह्यांतच मुक्तपणे फिरता येतं : तेही ओबडधोबड रस्त्यांनी.



**राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक**

*शिक्षण* : भूतानमध्ये १०वीपर्यंतचं शिक्षण सर्वांना मोफत मिळतं. प्रौढ-शिक्षण, निरंतर शिक्षण, व्यावसायिक शिक्षण ह्यांच्याही सोयी आहेत.

*आरोग्य* : १९६०पर्यंत लोक समृद्ध अशी पारंपरिक स्वास्थ्यप्रणाली वापरत होते. १९६१मध्ये पाश्चात्त्य प्रणालीचा उपयोग सुरू झाला. ८३% जनतेला पिण्याचं शुद्ध पाणी (झरे-नद्यांतून) मिळतं. ९१% जनतेला स्वच्छता-सुविधा उपलब्ध आहेत. जलसंजीवनी, आयोडीनयुक्त मीठ ह्यांचा दक्षिण आशियात सर्वप्रथम स्वीकार भूताननं केला. भूतानमधली प्राथमिक स्वास्थ्यसेवा विनामूल्य आहे.

## भूतानपुढील आव्हानं

विकासाच्या अशा एका आदर्श प्रतिमानाचं ध्येय भूतान गाठू पाहत असला, तरी त्याची वाटचाल निर्वेध राहीलच, ह्याची काही खात्री नाही. एक क्रांतिकारी विकास-संकल्पना भूतान राबवतो आहे; पण, जग त्याला ती राबवू देईल का? दोन अतिप्रचंड विकासेच्छू देश—चीन आणि भारत—दोन बाजूला असताना त्यांचा दबाव भूतानवर येईल का? चीननं तिबेट गिळंकृत केला, तसंच भूतानचंही होईल का : कारण चीनची संसाधनांची भूक राक्षसी आहे. अत्यंत जवळकीच्या संबंधांचा गैरफायदा भारत घेईल का?—भूतानच्या एकूण निर्यातीपैकी ९५% भारताला होते, नि आयातीपैकी ७४% भारतातून होते. भारत भूतानकडून मोठ्या प्रमाणावर जलवीज खरेदी करतो. भारताची विजेची भूक वाढते आहे. अशा वेळी भारत भूतानवर अधिक वीज-निर्मितीसाठी दबाव आणेल का? मोदींचा पहिला विदेश-दौरा भूतानला झाला, ही बाब ह्या दृष्टीनं बोलकी आहे. जगाला खनिजं मिळतील तितकी हवीच आहेत. अशा वेळी जंगलांखाली लपलेली खनिजं खणून काढण्यासाठी भूतानवर बड्या राष्ट्रांचा दबाव येईल का?

अंतर्गत दबावाचाही विचार करायला हवा. भूतानी जनता आज तरी GNHच्या तत्त्वांना मानते. पण, केबल-टीव्ही, इंटरनेट, मोबाईल ह्यांच्या विस्तारानंतर जनतेला उपभोगवादाचा मोह पडेल का? शहरांकडे होणारं स्थलान्तर वाढतं आहे : राजधानी थिंफूची लोकसंख्या १९६१ नंतर ७ पट झाली आहे. आरोग्यसुविधांमुळे लोकसंख्या वाढली, तर तिच्या उपजीविकेचं काय?

भूतानपुढे अशी अनेक आव्हानं आहेत. भूतान आपला निर्धार किती टिकवून ठेवतो ह्यावरच त्याचं आणि GNHचं भवितव्य अवलंबून आहे.

तूर्तास, विकासाची एक क्रांतिकारी संकल्पना मांडून ती राबवल्याबद्दल आपण भूतानचं अभिनंदन करू या आणि GNHमधून विकासाचा पट व्यापक केल्याबद्दल भूतानचे कृतज्ञ राहू या.


भूतानविषयक लेखनासाठी पुढील पुस्तकांचा/संदर्भांचा वापर केला आहे :

(१) Bhutan / Lily Wangchuk.

(२) भूतान-अध्ययन-केंद्राचे अध्यक्ष दाशो कर्म उरा ह्यांची मुलाखत.

(३) भूतानविषयक संकेतस्थळं : www.grossnationalhappiness.com आणि www.gnhbhutan.org

(४) भूतानविषयक अनुबोधपट.


## अंतर्बाह्य भयमुक्त जीवन जगणारा समाज

मी व माझे मित्र गेल्या मार्चमध्ये भूतानला १२ दिवसांसाठी जाऊन आलो. भारताला ते मोठा भाऊ समजत असल्यामुळे तिथे भारतीयांचे चांगले स्वागत होते. भारतीयांना व्हिसा लागत नाही; की, प्रत्येक दिवशी प्रवासी कर द्यावा लागत नाही.

भूतान व भूतानी लोक चांगले आहेत ह्याचा अनुभव पदोपदीं येत असतो. स्वस्त व उत्तम जेवण, निसर्गसौंदर्य, दऱ्या-खोऱ्यांतून वाहणाऱ्या नद्या, हवामान अतिशय चांगले व त्याच्या जोडीला तेथील लोकांचे अनुभव. जगाच्या पाठीवरील २५पेक्षा जास्त देशांमध्ये फिरून आलेल्या मला तर हे अनुभव चकित करणारे वाटले.

१. संपूर्ण बारा दिवसात एकदाही कशाचीही भीती वाटली नाही. (चोरी, महिलांना भीती, इ.) त्या उलट, भूतानी नागरिकांकडून आदरभाव व मदतीची भावना अनुभवायला मिळाली.

२. स्त्रीसत्ताक पद्धती असल्यामुळे महिलांचा सन्मान होताना पाहावयास मिळतो. लग्नानंतर पुरुष मुलीच्या घरी राहण्यास जातो.

३. माती आणि लाकूड ह्यांमधून घरांची उत्कृष्ट निर्मिती होते. घरे पर्यावरणपूरक आहेत. मी थोडा वेळ घराच्या बांधकामावर काम करून अनुभव घेतला.

४. टायगर नेस्ट ह्या पहाडावरून उतरत असताना दोन शाळकरी मुली कपडे धुताना पाहिल्या. त्या देवदर्शनासाठी पहाडावर आल्या होत्या. एक म्हातारी महिला कपडे धूत होती. तिला मदत करून देवाचीच सेवा करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

५. आमच्या ग्रूपमधील रमणीकभाई मोता ह्यांच्या पायाला चालताना जखम झाली. मी रमणीकभाईंना सरकारी हॉस्पिटलमध्ये नेले. सर्वच स्टाफ आदबीने व काळजीने सेवा करीत होता. औषधालयातून औषधे घेतली व बिल देण्यासाठी काऊंटरवर विचारणा केली; तर, भूतानमध्ये औषधे, ट्रीटमेंट, तपासणी सर्व मोफत असल्याचे सांगण्यात आले.

६. राजधानी थिंफूजवळच्या एका डोंगरावरील मंदिराला भेट देऊन उतरत असताना दूरवर पायथ्याजवळ एकटेच एक घर व एका बाळाला घेऊन एक महिला उभी दिसली. जैविक शेतीबद्दलची काही माहिती मिळविण्यासाठी मी तिकडे वळलो आणि तिच्या मोडक्या-तोडक्या हिंदीतून त्या महिलेशी चर्चा केली. मी तिला काही बीजं मागितली, तशी ती जिना चढत घरात गेली. मला तिने खिडकीतून हाक मारून वर बोलावले आणि कागदी खोक्यात तिने साठविलेली मिरची, चवळी, भोपळा, काकडी, इ.ची बीजे घेण्यास सांगितले. मी धन्यवाद मानून निघालो. एकटी स्त्री. मनात फक्त निर्मळ भाव. वाईट शंकासुद्धा मनात येत नाही, अशी त्या भूतानींची मानसिकता अनुभवावयास मिळाली.

एकूणच शुद्ध विचार, शुद्ध आचार, शुद्ध वातावरण, शुद्ध धन-धान्य, स्व-संस्कृतीचा अभिमान व त्या बरहुकूम वागणारे बौद्धधर्मीयांचे हे छोटेसे राष्ट्र जगाला सुख, समाधान, शांतता आणि भीतीयुक्त जीवन म्हणजे काय असते हे सांगत आहे. जगभरातले विचारवंत, अर्थतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी हे भूतानच्या GNHचा अभ्यास करू लागलेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक, सांस्कृतिक व पार्यावरणिक समृद्धी म्हणजे काय असते, हे भूतान तथाकथित पुढारलेल्या देशांना सांगत आहे. आपल्यालाही त्यांच्याकडून खूप शिकण्यासारखे आहे.

त्याच विचारांची प्रेरणा घेण्यासाठी, वेगळ्या प्रकारच्या शिक्षण-व्यवस्थेचा पाया घालण्यासाठी भूतानमधील रॉयल इंस्टिट्यूटमध्ये काम (नोकरी) करण्यासाठी माझा मुलगा विपुल ऑक्टोबर २०१४पासून भूतानला गेला आहे.

*—अभय शहा, पणदरे, ता. बारामती*

## सेंद्रिय बनलेला

# क्यूबा

**क्यूबाला सोविएत महासंघाचा भक्कम पाठिंबा होता. तो आधार कोसळल्यावर क्यूबाची स्थिती दयनीय झाली. तथापि, अमेरिकेच्या विरोधाला न जुमानता कास्ट्रोच्या खंबीर नेतृत्वाखाली क्यूबानं दुसरी क्रांती केली : सेंद्रिय क्रांती! त्या वाटचालीचा हा आलेख.**

क्रिकेटमुळे आपल्याला वेस्ट इंडीज हा देश सुपरिचित आहे. अनेक बेटांचा तो बनलेला आहे. त्या बेटांना 'कॅरेबियन बेट' असं नाव आहे. अशा बेटांपैकीच एक आहे क्यूबा. कोलंबस पाचशे वर्षांपूर्वी भारत शोधायला निघाला, तो पोहोचला ह्या बेटांवर. १४९२मध्ये हे बेट पाहिल्यावर तो म्हणाला, ''माणसाने आत्तापर्यंत पाहिलेल्यापैकी ही सर्वांत सुंदर भूमी आहे!''

दुर्दैवानं, कोलंबसाचे इरादे साफ नव्हते, नि ह्या सुंदर भूमीच्या विद्रूपीकरणाला त्याच्यापासूनच प्रारंभ झाला. क्यूबा ही स्पेनची वसाहत बनली. स्पेनियांनी इतरत्र जे केलं, तेच क्यूबातही केलं : मूळ लोकांचा वंशच्छेद. 'आरावाक' वंशाचे हे लोक माती आणि खताचे गादीवाफे करून त्यावर पिकं घ्यायचे. त्यांच्याबरोबरच ही शेती-पद्धती संपुष्टात आली.

स्पेनला रस होता आर्थिक फायदा मिळवण्यात. म्हणून त्यांनी त्या उष्णकटिबंधीय देशात ऊस आणि तंबाखू ही नगदी पिकं मोठ्या प्रमाणावर घ्यायला प्रारंभ केला. 'क्यूबन सिगार' तेव्हापासून प्रसिद्ध आहे. स्थानिक लोकांची कत्तल केल्यानं सुमारे ५ लाख आफ्रिकी गुलाम क्यूबात कामासाठी आणले गेले.

१८९८मध्ये 'क्यूबाच्या स्वातंत्र्यलढ्यात' अमेरिकेनं (संयुक्त संस्थाने) स्पेनवर विजय मिळवला. त्यानंतरच्या तीन दशकांत अमेरिकी साखर-सम्राटांनी क्यूबातली बरीच जमीन विकत घेतली. वनं मोठ्या प्रमाणावर तोडली गेली. सर्वत्र उसाची लागवड होऊ लागली. साखरेचं उत्पादन वाढू लागलं. १९३०मध्ये क्यूबा हा जगातला सर्वांत मोठा साखर-उत्पादक होता. अमेरिकेनं क्यूबाला 'विशेष व्यापारी दर्जा' दिलेला होता : ६० लक्ष टन साखर ती दरवर्षी खरेदी करायची.

क्यूबा ही जणू अमेरिकेची वसाहतच होती. १९५८पर्यंत अमेरिकी साखर-उद्योग आणि धनवंतांनी मिळून क्यूबातली लागवडीखालची ७५% जमीन आपल्या ताब्यात घेतली होती. क्यूबातील मूठभर श्रीमंत हे अमेरिकाधार्जिणे होते, नि एकामागून एक अध्यक्षही.

ऊस-तोडणीसाठी मोठ्या प्रमाणावर मजूर लागत. पण, त्यांना वर्षातले फक्त ४-६ महिनेच काम असे. त्या काळात त्यांना गुलामासारखं राबवून घेऊन नंतर वाऱ्यावर सोडून दिलं जात असे. ह्या विषमतेची, अन्यायाची चीड येऊन ध्येयवेडे तरुण उठाव करत. क्यूबाचा अध्यक्ष अमेरिकी सैन्याला पाचारण करून ते दडपून टाकी. पहिल्यापेक्षा दुसरा अध्यक्ष अधिक भ्रष्ट निघावा; त्याने आधीच्यापेक्षा अधिक पैसा परदेशी बँकांत ठेवावा, असं चाललं होतं. अशांपैकीच एक होता बाटिस्टा.

१९५३मध्ये फिडेल कास्ट्रो नावाच्या एका धाडसी तरुणानं बाटिस्टाच्या राजवटीविरुद्ध उठाव केला. तो अयशस्वी झाला. कास्ट्रोला तुरुंगवासाची शिक्षा झाली. पुढे १९५५मध्ये राजकीय कैद्यांना माफी मिळून कास्ट्रो सुटला. मग त्यानं मेक्सिकोत जाऊन साथीदार, शस्त्रं आणि पैसे मिळवले आणि १९५९मध्ये बाटिस्टाची राजवट उलथून टाकली. फिडेल कास्ट्रो आणि चे गव्हेरा हे त्यातून जगातल्या क्रांतिवादी चळवळीचे नायक बनले.

*अमेरिकेनं सर्व बाजूंनी कोंडी केल्यानं क्यूबाला अमेरिकेच्या विरोधी असणाऱ्या साम्यवादी गटाचा आश्रय घेणं भाग पडलं.*

### कास्ट्रोची राजवट

सत्तेवर येताच कास्ट्रोनं शेती-सुधारणा-नियम अमलात आणले. जमीनधारणेवर त्यानं मर्यादा आणली, आणि मुक्त झालेल्या जमिनी ऊस-तोडणी मजूर आणि भूमिहीनांना दिल्या. १९६३पर्यंत सुमारे २ लक्ष शेतकरी अशा प्रकारे आपापली जमीन कसू लागले होते; तर, जवळपास ७०% जमिनींचं राष्ट्रीयीकरण केलं गेलं होतं.

अमेरिका ह्यामुळे चवताळली नसती, तरच नवल! तिनं क्यूबाकडून ७ लक्ष टनांची त्या वर्षीची साखर-खरेदी तर रद्द केलीच; पण, पुढच्या काळासाठीचेही सर्व खरेदी-करार रद्द करून टाकले. शिवाय क्यूबाच्या ह्या 'नाठाळपणा'ला नेस्तनाबूत करण्यासाठी त्यावर व्यापार-बहिष्कार घातला. शिवाय, अमेरिकेशी संबंध असणाऱ्या कोणत्याही उद्योगानं क्यूबाला काही विकू नये, अशीही तंबी जगाला दिली.

पण, ह्यामुळे झालं असं की, अमेरिकेनं सर्व बाजूंनी कोंडी केल्यानं क्यूबाला अमेरिकेच्या विरोधी असणाऱ्या साम्यवादी गटाचा आश्रय घेणं भाग पडलं. वस्तुत: कास्ट्रोनं केलेली क्रांती ही काही 'साम्यवादी क्रांती' नव्हती. तथापि, काहीशा अगतिकतेतून कास्ट्रोला त्या गटात सामील व्हावं लागलं.

सोविएत महासंघासाठी ही एक सुवर्णसंधीच होती. अमेरिकेपासून अक्षरश: हाकेच्या अंतरावर असणारा एक देश आपणहून त्याच्या गोटात सामील झाला होता! सोविएत महासंघानं क्यूबाची सर्व साखर —आणि तीही अमेरिकेपेक्षा जास्त दरानं—विकत घेण्याचं कबूल केलं. शिवाय, अमेरिका दरवर्षी नवा करार करायची, त्याऐवजी सोविएत महासंघानं ५ वर्षांचा करार केला. साम्यवादी देशांची COMECON नावाची व्यापार-संघटना होती. क्यूबाला त्या देशांना आपली साखर जागतिक भावाच्या ५ पट भावानं विकता येऊ लागली. त्या व्यतिरिक्त सोविएत महासंघाकडून त्याला खूप स्वस्तात खनिज तेल, कृषिरसायनं, आणि मुख्य म्हणजे अन्नधान्य मिळण्याची सोय झाली.

वास्तविक कास्ट्रोच्या सरकारनं 'ऊस एके ऊस' हे धोरण बदलून शेतीत वैविध्य आणण्याला प्राथमिकता देण्याचं घोषित केलं होतं. पण, अमेरिकेनं केलेल्या कोंडीमुळे निर्यातीसाठी साखरच तयार करणं क्यूबाला भाग पडलं. त्यातून कृषि-वैविध्याची प्राथमिकता खाली घसरली.


अधिक ऊस-उत्पादनासाठी क्यूबाला आधुनिक शेती-पद्धतीची कास धरणं भाग पडलं : भरपूर खतं, कीटकनाशकं आणि यांत्रिकीकरण. १९८०च्या दशकात क्यूबाकडे दर १००० हेक्टरी २१ कर्षित्रं (ट्रॅक्टर) होती. संपूर्ण दक्षिण अमेरिकेतलं हे सर्वाधिक प्रमाण होतं. शेतीसाठी कर्षित्रं वापरण्यामुळे बैलजोड्यांची संख्या हळूहळू घटत गेली, नि १ लाखाखाली आली. त्याच काळात क्यूबा १३ लक्ष टन रासायनिक खतं, १७,००० टन तणनाशकं आणि १०,००० टन कीटकनाशकं आयात करायचा. सर्व रसायनं, सर्व यंत्रसामग्री, सुटे भाग आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे खनिज तेल हे सगळं त्याला साम्यवादी गटाकडून मिळायचं. एक आकडेवारी असं सांगते की, क्यूबीय जनतेच्या आहारातले सरासरी ५७% उष्मांक हे आयात झालेले असायचे. प्रथिनं आणि स्निग्ध पदार्थांच्या बाबतीतलं हे प्रमाण तर ८०% इतकं मोठं होतं. निर्यात मुख्यत्वे ३ बाबींची होती : साखर, तंबाखू आणि लिंबूवर्गीय फळं. साखरेचा वाटा सर्वाधिक. क्यूबा जणू साखर विकून बाकी सर्व काही विकत घ्यायचा!

अमेरिकेला जराही धूप न घालता क्यूबानं आपली अर्थव्यवस्था ह्या प्रकारे सावरली. नुसती सावरली असं नाही, तर त्यानं बऱ्यापैकी समृद्धीही कमावली. PQLI ह्या निर्देशांकानुसार क्यूबा १९८९मध्ये जगात ११व्या स्थानावर होता; तर अमेरिका १५व्या स्थानावर! क्यूबाची बलस्थानं होती फिडेल कास्ट्रो, त्याला एकजुटीनं साथ देणारी जनता आणि देशातले शास्त्रज्ञ. लॅटिन अमेरिकेतील अवघी २% लोकसंख्या क्यूबात आहे; पण, शास्त्रज्ञांच प्रमाण मात्र ११% आहे.

एके काळी अमेरिकेचं बाहुलं असलेला क्यूबा हा तिनं घातलेल्या व्यापार-बंदीतून अशा प्रकारे सहीसलामत सुटून प्रगत होत आहे, हे अमेरिकेला खुपत होतंच. 'सारं जग आपल्या तालावर नाचलं पाहिजे'; 'साऱ्या जगाचं शोषण आपण एकटे करणार' असा अमेरिकेचा तोरा असतो. जिथे जिथे अमेरिकेला धार्जिणे नसणारे शासक निर्माण होतात; अमेरिकी बहुराष्ट्रीय उद्योगांना विस्तार करू देण्याचं ते नाकारतात, तिथे तिथे अमेरिका अशा शासकांना येनकेन प्रकारेण संपवण्याचा सतत प्रयत्न करते. गेल्या काही दशकांत मध्यपूर्वेत घडलेल्या घटना आपण पाहिल्याच आहेत. क्यूबाच्या बाबतीतही हेच घडलं. फिडेल कास्ट्रो हा खंबीर नेता अमेरिकेच्या डोळ्यांत सलत होता; नि त्याला ठार करण्याचे ३५०हून अधिक प्रयत्न अमेरिकेच्या गुप्तहेर खात्यानं केले! मात्र, हे सर्व अयशस्वी होऊन कास्ट्रो जिवंत राहिला.

पण, एकीकडे क्यूबाची अशी प्रगती होत असताना तिथल्या निसर्गावर तिचे जे काही दुष्परिणाम व्हायचे, ते टळू शकत नव्हते. रसायन-सघन, औद्योगिक अशी जी शेती असते, ती जमिनीचा नाश करते. मातीची धूप, माती घट्ट होत जाणं, जमिनी खारपड होणं, पिकांवरच्या रोगांचं प्रमाण वाढत राहणं, किडी अधिकाधिक कीटकनाशक-प्रतिरोधक बनत जाणं, कस घटत जाऊन उत्पादन कमी होत जाणं, भूजलाची पातळी खाली-खाली जाणं, नद्या-तळी कृषि-रसायनांनी प्रदूषित होणं... असंख्य समस्या निर्माण होत होत्या.

शेतीचं जसजसं अधिकाधिक यांत्रिकीकरण होत गेलं, तसतशी ग्रामीण बेकारांची संख्या वाढून शहरांकडे होणारं स्थलांतर वाढलं. १९५६मध्ये ५६% असलेली ग्रामीण लोकसंख्या, १९८९मध्ये २८% वर आली. ह्यातून शहरी व्यवस्थेवरचा ताण वाढत गेला.




* * *

अनेक विचारवंतांना हे चित्र पटत नव्हतं. निर्याताभिमुख शेती ही एकीकडे बाहेरून येणाऱ्या निविष्टांवर अवलंबून होती; आणि दुसरीकडे बाह्य बाजारपेठेवर. ह्या दोन्ही गोष्टींवरचं मोठ्या प्रमाणावरचं अवलंबित्व त्यांना बेभरवशाचं आणि धोक्याचं वाटत होतं. ह्यातूनच, १९८२च्या सुमारास 'पर्यायी शेती'ची चळवळ क्यूबात सुरू झाली. देशभरातील अल्पभूधारक शेतकऱ्यांनी एक राष्ट्रीय संघटना स्थापन केली. अनेक जण शेती-उत्पादन-सहकारी संस्थांचे वा पत-सेवा-पुरवठा-सहकारी संस्थांचे सभासद झाले. ह्या शेतकऱ्यांनी पीक-वैविध्य जपलं. ते बैलांचा वापर करायचे. बाह्य निविष्टांचा वापर न करता ते स्वयंपूर्ण आणि धारणाक्षम शेती करायचे.

१९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात क्यूबानं 'राष्ट्रीय अन्न कार्यक्रम' सुरू केला. त्या अंतर्गत राजधानी हवानाच्या आसपासची सुमारे २०,००० हेक्टर उसाखालची जमीन भाजीपाल्याच्या लागवडीखाली आणण्याचं पहिलं उद्दिष्ट होतं. शाळा, कार्यालयं ह्यांच्या आवारात हवाना शहर स्वत:साठीचा भाजीपाला पिकवणार होतं. ह्यासाठी झालेल्या बैठकांमध्ये 'जनशक्ती' (People's Power) ह्या संघटनेनं आधुनिक शेती-पद्धतीवर खूप टीका केली. विकेंद्रीकरण, स्थानिक सेंद्रिय खतं, जैविक कीड-नियंत्रण अशा पद्धतींचा आग्रह धरला. भाजीपाला-लागवडीच्या बाबतीत ह्यातल्या काही बाबी अमलातही आल्या.

### तडिताघात

पण, ह्या 'राष्ट्रीय अन्न कार्यक्रमा'नं वेग घेण्याआधीच क्यूबावर जणू वीजच कोसळली. तिचा एकमेव आधार असलेला खांबच कोसळला! ब्रेझनेव्हच्या जागी गोर्बाचेव्ह सत्तेवर आले, नि सोविएत महासंघाच्या विघटनाला प्रारंभ झाला. १९८९मध्ये ही महासत्ता संपुष्टात आली.

ह्या घटनेचे क्यूबावर झालेले परिणाम अतिगंभीर होते. सोविएत महासंघ क्यूबाला ९८% खनिज तेल पुरवत होता. १९८८मध्ये १.३ कोटी टन तेल क्यूबानं आयात केलं होतं. १९९१मध्ये ते ६० लक्ष टनांवर आलं. तेलाशिवाय ६६% अन्नधान्य, ८६% कच्चा माल आणि ८०% यंत्रसामग्रीही त्यांच्याकडूनच आयात व्हायची. क्यूबाची ८५% निर्यातही ह्याच देशांना व्हायची : ६६% साखर आणि ९८% लिंबूवर्गीय फळं.

*आयात-निर्यातीचं चक्र अचानकपणे खंडित झाल्यावर क्यूबाची स्थिती मोठी गंभीर झाली. कास्ट्रोच्या सरकारनं 'शांततेच्या काळातली आणीबाणी' घोषित केली.*

हे सारंच आयात-निर्यातीचं चक्र अचानकपणे खंडित झाल्यावर क्यूबाची स्थिती मोठी गंभीर झाली. औद्योगिक उत्पादन थंडावलं; कारखाने बंद पडले; बरीचशी वाहतूक पेट्रोल-डीझेलअभावी बंद पडली. कृषिरसायनं मिळेनाशी झाली आणि अन्नटंचाईनं भीषण स्वरूप धारण केलं.

साखर-निर्यातीतून क्यूबाला १९८९मध्ये ५३९ कोटी डॉलर मिळाले होते; ते १९९३मध्ये ११६ कोटी डॉलर इतके घटले. साहजिकच १९८९मधली ८१४ कोटी डॉलरांची आयात कमी करावी लागून ती २०१ कोटी डॉलरांवर (२५%) आली.

कास्ट्रोच्या सरकारनं 'शांततेच्या काळातली आणीबाणी' घोषित केली. युद्धकाळात जसे कठोर निर्णय घ्यावे लागतात, तसे ह्या काळात घेतले गेले. पहिला होता अन्नधान्यांच्या शिधाघटीचा : आयातही घटली नि देशांतर्गत उत्पादनही घटलं, त्यामुळे अन्नपुरवठा कमी करणं भाग पडलं. त्यामुळे क्यूबीय जनतेची उपासमार होऊ लागली. अन्नातलं स्निग्धांशांचं प्रमाण तर खूपच घटलं. त्याच जोडीला, शारीरिक श्रमांमध्येही—चालणं, सायकलन, विविध कामं—एकदम वाढ झाली. अनेक लोकांची वजनं ८ ते १५ कि.ग्रॅ.नं घटली.

ह्या परिस्थितीमुळे लोक हबकून गेले. काही जण देश सोडून गेले; पण, अनेकांनी हे आव्हान स्वीकारण्याचा निश्चय केला. हे आव्हान महाप्रचंड होतं. निम्म्याहून कमी निविष्टांच्या आधारे धान्योत्पादन दुपटीहून अधिक वाढवण्याचं!

अमेरिकेनं ही संधी साधून क्यूबाभोवतीचा फास आणखी आवळला. क्यूबावरचे व्यापार-निर्बंध तिनं आणखी कडक केले. अमेरिकी उद्योगांच्या सर्व परकीय उप-उद्योगांवर क्यूबाशी व्यापार करण्याला बंदी घातली. क्यूबाकडे जाणाऱ्या जहाजांना अमेरिकी बंदरांत थांबण्याला मनाई केली. ही बंदी मोडल्यास जहाज जप्त करण्याची तंबी दिली. सोविएत महासंघातले

नवस्वतंत्र देश आर्थिक दृष्ट्या डबघाईला आलेले होते. 'आमची मदत हवी असेल, तर क्यूबाशी व्यापार करायचा नाही' अशी अट अमेरिकेनं त्यांना घातली.

हे सर्व झालं १९९२मध्ये. त्यानंतर १९९६मध्ये अमेरिकी सिनेटनं 'क्यूबा स्वातंत्र्य आणि लोकशाही दृढीकरण कायदा' संमत केला. त्यानुसार, अमेरिकी वा अमेरिका-स्नेही उद्योगांवर क्यूबाला अन्न वा औषधं विकण्यावरही बंदी घालण्यात आली. क्यूबातील विदेशी गुंतवणुकीवरही बंधनं लादण्यात आली. ह्या कायद्याला 'हेल्म्स्-बर्टन कायदा' असं नाव आहे. त्याचे जनक सिनेटर जेस्सी हेल्म्स् ह्यांनी त्यांचा हेतू कायदा संमत होण्याच्या वेळी ह्या शब्दांत सांगितला : 'आम्हाला कास्ट्रोचं सरकार जाऊन क्यूबात अमेरिका-स्नेही सरकार यायला हवं आहे. चालू वर्ष हे क्यूबीय जनतेनं कास्ट्रोला रामराम करण्याचं असावं असं आम्हाला वाटतं. कास्ट्रो उभा बाहेर जातो की आडवा ह्याच्याशी मला देणंघेणं नाही : तो जाणार हे निश्चित'.

पण, तो नेता फिडेल कास्ट्रो हा होता, नि तो देश क्यूबा. अमेरिकेच्या दबावाखाली चिरडून मरण्यापेक्षा क्यूबाच्या नेत्यानं आणि जनतेनं जगात आजवर न घडलेली एक क्रांती करण्याचा निर्णय घेतला : सेंद्रिय क्रांती!

## सेंद्रिय क्रांतीचा प्रारंभ

१९९०मध्ये 'जिवंत राहण्यासाठी शेती' ह्या योजनेला सुरुवात झाली. कास्ट्रोनं सांगितलं की, 'जिथे कुठे धान्य उगवू शकेल, अशा सर्व जमिनीवर शेती करा. इंचभरही जागा रिकामी सोडू नका.' लोकांनी अशी सर्वत्र शेती करायला सुरुवात केली. रासायनिक खतं उपलब्ध नव्हतीच; त्यामुळे जी कुठली सेंद्रिय द्रव्यं मिळतील ती जमिनीला देऊन लोकांनी धान्योत्पादन घ्यायला प्रारंभ केला.

सरकारनं शेतीचं पुरतं विकेंद्रीकरण करून टाकलं. ग्राहक आणि उत्पादक ह्यांच्यातलं अंतर न्यूनतम करून टाकून वाहतूक टळेल हे पाहिलं. कार्यालयं, संस्था ह्यांनी आपापल्या मोकळ्या जागांवर शेती करायला सुरुवात केली. ज्यांच्याकडे जमीन नव्हती, अशांना सरकारनं उपजाऊ जमिनी कसायला दिल्या. शेतांतलं धान्य थेट शिधावाटप-केंद्रांना, रुग्णालयांना वा अन्य विक्रीकेंद्रांना दिलं जाऊ लागलं.

ह्या क्रांतीची २ अंगं होती : कृषिगत आणि व्यवस्थागत.

**(१) कृषिगत परिवर्तनं** : ऊस-शेतीतील कैक दशकांच्या रासायनिक खतांच्या वापरामुळे क्यूबीय जमिनींचा उपजाऊपणा घटत गेला होता. १९९०नंतर रासायनिक खतांची उपलब्धता एकदमच घटल्यानं शेतकऱ्यांना स्थानिक खत-उत्पादनाकडे वळावंच लागलं. शेणखत आणि गांडूळखत हे त्यासाठीचे उपलब्ध पर्याय होते. १९९८पर्यंत त्यांचं उत्पादन ७ लक्ष टनांवर पोहोचलं होतं. २००३मध्ये केवळ गांडूळखताचं उत्पादनच १० लक्ष टन झालं; तर, अन्य सेंद्रिय खतांचं १५ लक्ष टन.

ऊसशेतीमध्ये रासायनिक खतांऐवजी, साखर-कारखान्यात उसाचा रस गाळल्यावर जो चोथा उतरतो, त्याचा वापर सुरू झाला.

नत्राच्या भरपूर पुरवठ्यासाठी क्यूबीय शेतकऱ्यांनी जिवाणूंचा वापर सुरू केला. ऱ्हायझोबियम्, अ‍ॅझोबॅक्टर, अ‍ॅझोस्पिरिलम् हे जिवाणू हवेतल्या नत्राचं जमिनीत स्थिरीकरण करतात. जमिनीतला जैवभार वाढवण्यासाठी पिकांचे अवशेष, हिरवी खतं, स्थानिक झुडपं-झाडं -द्विदल वनस्पती ह्यांच्या पाल्याची पाचळण, इ.चा वापर करण्यास प्रारंभ झाला.

कीड-नियंत्रणासाठीही नैसर्गिक शत्रूंचा वापर केला गेला. उदाहरणार्थ, बटाटा पोखरणाऱ्या किडीला फस्त करण्यासाठी मुंग्यांचा वापर केला गेला. स्थानिक झाडांचे पाले वाटून त्यांची फवारणी केल्यानं काही किडींचं पुनरुत्पादन थांबू लागलं, नि त्या आटोक्यात आल्या. ह्यातला सर्वांत जास्त वापरला जाणारा पाला होता कडुनिंबाचा. क्यूबात आता १० लाखांहून अधिक निंबाची झाडं आहेत. निंबोण्यांच्या अर्काच्या वापरानं २५ हून अधिक प्रजातींच्या कीटकांचं नियंत्रण होतं. निंबोण्यांवर प्रक्रिया करणारे, प्रत्येकी २०० टन वार्षिक क्षमतेचे ४ कारखाने क्यूबात आहेत.

*डीझेल आणि सुट्या भागांअभावी कर्षित्रं गंजत पडल्यानं पुन्हा बैलांचे पाय धरण्याची पाळी क्यूबावर आली!*

क्यूबातले छोटे, पारंपरिक शेतकरीच काय ती फायदेशीर आणि धारणाक्षम शेती करत होते. आयात रसायनांचा वापर करणारी मोठी शेती त्यांच्याइतकी उत्पादक नव्हती. हे लक्षात घेऊन पारंपरिक शेती-पद्धतींचं पुनरुज्जीवन करण्यात आलं. पाचळण करणं, आंतरपिकं घेणं, पिकांचा फेरपालट, जमीन पड ठेवणं, नांगरणीसाठी बैलांचाच वापर करणं, पारंपरिक बियाण्यांचा वापर अशा पद्धती पुन्हा वापरात आल्या. ह्यातून शेतीचं विविधीभवन होऊन स्थिरता वाढली. परस्परपूरकता निर्माण होऊन सर्वच पिकांचं उत्पादन वाढलं.

१९५०च्या दशकात ४ लाख असलेली बैलजोड्यांची संख्या क्रमश: घटत जाऊन १९९०मध्ये नगण्य झाली. पण, आता डीझेल आणि सुट्या भागांअभावी कर्षित्रं गंजत पडल्यानं पुन्हा बैलांचे पाय धरण्याची पाळी क्यूबावर आली! मांसासाठीची गाई-बैलांची कत्तल तातडीनं थांबवण्यात आली. आंदोलन करावं न लागताच गोहत्याबंदी झाली! चांगली जनावरं निवडून बैलांची वंशवृद्धी करण्याचा धडक कार्यक्रम हाती घेतला गेला. २००२पर्यंत ३ लक्ष बैलजोड्या शेतीची आणि ग्रामीण वाहतुकीची कामं करू लागल्या होत्या! शेणाची उपलब्धता, वेगवेगळ्या पिकांची आंतरमशागत करण्याची लवचीकता, जमिनी घट्ट न बनणं, माती भुसभुशीत राहणं असे ह्याचे अनेक सहकारी लाभ झाले. दुधाचा जोडधंदा आणि पूरक अन्न उपलब्ध झालं.

हे सगळं शिकण्यासाठी क्यूबातल्या कृषि-वैज्ञानिकांचं फार मोठं वि-शिक्षण (de-learning) व्हावं लागलं. दिवाळखोरीकडे जाणारी आधुनिक शेती ते शिकले होते. आता त्यांना पारंपरिक शेतकऱ्यांचे पाय धरावे लागले.

शेतीच्या जोडीला क्यूबानं वनीकरणाकडेही लक्ष दिलं. १९९१मध्ये १४% असलेलं वनक्षेत्र २००६मध्ये २५% इतकं झालं. जमिनीची धूप रोखणं आणि जलस्तर वाढवणं ह्यांसाठी वनांचा उपयोग होत आहे. वनांमुळे पक्षी वाढून कीड-नियंत्रणही होत आहे. वनांचे अन्यान्य पार्यावरणिक उपयोग तर आहेतच.

क्यूबानं जागा मिळेल तिथे भातपीक घेण्याची एक लोकप्रिय 'चळवळ' सुरू केली : रिकामे भूखंड, दोन ऊस-शेतांतल्या रिकाम्या जागा... सगळीकडे. २००१मध्ये भाताचं निम्मं उत्पादन ह्या प्रकारे मिळत होतं. १९९८नंतर 'मादागास्कर-पद्धती'चा अवलंब करायला प्रारंभ झाला. ह्यातून काही ठिकाणचं उत्पादन दुपटीनं वाढलं. १९९८मध्ये क्यूबाचं भात-उत्पादन १,७२,००० टन होतं, ते २००३मध्ये सुमारे ३,००,००० टन झालं. ह्या सर्व उपलब्धींकरताच स्वीडनच्या संसदेनं क्यूबाच्या 'सेंद्रिय शेती संघटनेला' १९९९मध्ये 'Right Livelihood Award' हा (पर्यायी नोबेल) पुरस्कार देऊन गौरविलं.

**(२) व्यवस्थागत परिवर्तनं** : क्यूबीय सरकारनं शेतीचं विकेंद्रीकरण आणि विविधीकरण करून टाकल्याचा उल्लेख पूर्वी आला आहेच. त्यानंतरचं पाऊल होतं उदारीकरणाचं. शेतकऱ्यांना आपला शेतीमाल प्रचलित बाजारभावानं खुल्या बाजारात विकण्याची परवानगी देण्यात आली. ह्यातून, अधिक पैसे कमावण्यासाठी अधिक उत्पादन होऊ लागलं. (मात्र, ते सेंद्रिय होतं.) शासकीय संस्था देखील ह्यात सहभागी झाल्या. कृषि-मंत्रालयानं हवानातील आपल्या मुख्यालयासमोरची हिरवळ उखडून नष्ट केली, नि तिथे लेट्यूस, केळी आणि घेवड्याचं उत्पादन घ्यायला सुरुवात केली. एरवी खुर्ची न सोडणारे शासकीय बाबू पाणी देण्याची, खुरपणीची कामं करू लागले! ते पीक त्यांच्याच कँटीनमध्ये वापरलं जाऊ लागलं.

संरक्षण खात्यानं सांगितलं : 'धान्योत्पादन (अन्नसुरक्षा) हे आमचं प्राथमिक उद्दिष्ट आहे'. आता, लोकांनी लष्करच्या भाकऱ्यांसाठी धान्य न पिकवता, उलट लष्करच आपली गरज भागवून जनतेला धान्य पुरवू लागलं. १ वर्षाच्या सक्तीच्या सैनिकी सेवेला पर्याय म्हणून तरुणांना लष्कराच्या ९३पैकी कोणत्याही एका शेतीत काम करण्याची अनुमती देण्यात आली.

कार्यालयं, संस्थांना आपलं अन्न आपणच पिकवण्याचं बंधन घालण्यात आलं. ह्यातून वाहतूक, शीतीकरण ह्यांसाठीचं इंधन वाचू लागलं.

१९९३मध्ये सरकारनं एक महत्त्वाचा आणि अत्यावश्यक निर्णय केला. मोठमोठे शासकीय कृषि-प्रदेश संपुष्टात आणून, त्यांचे छोटे तुकडे शेतकऱ्यांना सहकारी शेतीसाठी देण्यात आले. १९९०पर्यंत एकूणापैकी ८२% शेतजमीन सरकारच्या ताब्यात होती. १९९३मधल्या ह्या निर्णयानंतर त्यांपैकी ६०% जमीन शेतकरी-गटांकडे वर्ग झाली. जमिनीची मालकी सरकारचीच राहिली; पण, बाकी सर्व अधिकार गटांकडे आले. १९९८पर्यंत सुमारे १२ लक्ष लोक २५०० गटांमधून आपली उपजीविका स्वावलंबीपणे चालवू लागले होते.

आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे साखर-कारखाने बंद करणं. २००६पर्यंत १५५पैकी ११० कारखाने बंद केले जाऊन १० लाख हेक्टर जमीन शेती आणि वनीकरणासाठी उपलब्ध केली गेली.

१९६०पासूनच कार्यरत असलेल्या सहकारी शेती-संस्थांनाही ऊर्जितावस्था आली. स्वत:ची छोटी शेती असणाऱ्यांनी पत- आणि सेवा-पुरवठा-संस्था सुरू केल्या. कर्ज-पुरवठा, शासकीय सेवांचा लाभ घेणं, काही अवजारांचा सामायिक उपयोग अशा गोष्टींसाठी ह्या संस्था उपयोगी पडू लागल्या. २००२पर्यंत अशा संस्थांची सदस्य-संख्या १,६८,००० झाली होती. सुमारे १० लक्ष हेक्टर जमीन ते कसत होते. कृषि-उत्पन्नाच्या बाबतीत सहकारी संस्था वा शासकीय जमिनींवर काम करणारे गट ह्या दोन क्षेत्रांपेक्षाही ह्या क्षेत्राचं योगदान मोठं होतं : एकूणापैकी २०% क्षेत्र, २०% संसाधनांचा वापर; पण, राष्ट्राच्या कृषि-उत्पादनातला वाटा मात्र घसघशीत ३५%!

*शहरातल्या लोकांनी कायम बांडगुळी पद्धतीनंच जगायचं का? क्यूबानं ठरवलं की, 'नाही : शहरातही शेती केली पाहिजे'.*

खासगी मालकीच्या शेतीचं हे महत्त्व जाणून १९९४मध्ये सरकारनं १२१ शेतकरी-बाजार चालू केले. इथे शेतकरी खुल्या पद्धतीनं आपला भाजीपाला, फळं, धान्य विकू लागले. त्यातून पुन्हा उत्पादन-वाढीला प्रोत्साहन मिळालं. उत्पादक-उपभोक्त्यांमधील कमी अंतरामुळे वाहतूक, साठवणूक, शीतीकरण ह्यांच्यावरचा खर्च—अन् मुख्य म्हणजे इंधन—वाचू लागलं. १९९८पर्यंत बाजारांची संख्या ३००च्या वर गेली. इथे शेतकऱ्यांनी अतिनफेखोरी करू नये म्हणून त्यांना समांतर असणारी शासकीय व्यवस्था मर्यादित उत्पादन २०% कमी किंमतीला विकते.

हे झालं खेड्यातलं : शहरातल्या लोकांनी कायम बांडगुळी पद्धतीनंच जगायचं का? क्यूबानं ठरवलं की, 'नाही : शहरातही शेती केली पाहिजे'. ह्यातून शहरी-शेतीची चळवळ सुरू झाली. हवाना ह्या राजधानीच्या आणि मोठी लोकसंख्या असलेल्या शहरात तीवर विशेष भर दिला गेला. १९८९पूर्वी हवानातली स्थिती उलटी होती : घरापुढे काहीही पिकवायला बंदी होती. फक्त शोभेची झाडंच लावली जाऊ शकायची. परसबागेला परवानगी होती; पण, कुणीच बागा करत नसे. आयात केलेलं का असेना; पण, शहरातल्या गरिबालाही पोटभर अन्नधान्य मिळायचं. मग भाज्या-फळं पिकवतो कोण?

पण, १९९०मध्ये हे चित्र पूर्णपणे बदललं. आयात अत्यंत कमी झाली. हवानात २२ लाख लोक राहायचे : क्यूबाची सुमारे १/५ जनसंख्या. तिच्यापुढे समस्या निर्माण झाली. मग, आपोआप आणि अचानकपणे शहरी शेतीचं पेव फुटलं. अवघ्या ५ वर्षांत हवाना परिसरात २८,००० अंगणबागा आणि परसबागा अन्न पिकवू लागल्या. रिकाम्या असणाऱ्या प्रत्येक चौरस फुटावर अन्ननिर्मिती होऊ लागली. १९९२मध्ये शून्य उत्पादन असणाऱ्या शहरी शेतीतून १९९३मध्ये काही शे टन; १९९४मध्ये काही सहस्र टन, दशकभरानंतर १०-१२ लक्ष टन; तर २००६मध्ये ३० लक्ष टन उत्पादन निघू लागलं! लोकांनी अंगण-परसांबरोबरच बाल्कन्या, गच्च्यांवरही शेती सुरू केली. जमिनीखाली कंदमुळं, जमिनीवर भाजीपाला; आणि गच्चीवरच्या मांडवांवर



फिडेल कास्ट्रो

वेलीभाज्या अशी त्रिस्तरीय शेती सुरू झाली. लोकांना फक्त खाण्याची माहिती होती : पिकवण्याचं काहीच ज्ञान नव्हतं. म्हणून सरकारनं तातडीनं 'शहरी शेती खातं'च सुरू करून लोकांच्या उत्साहाला टेकू दिला. त्यामुळे लोकांना पाठबळ, सल्ला आणि सर्व सुविधा मिळू लागल्या. सरकारनं जमीन-धारणाविषयक कायद्यांतही बदल करून अन्न पिकवू इच्छिणाऱ्या नागरिकांना रिकामे भूखंड त्वरेनं उपलब्ध करून दिले. रिकाम्या जागा नुसत्याच पाडून ठेवणाऱ्यांना ते वहितीखाली आणण्यासाठी ६ महिन्यांची मुदत दिली गेली. तेवढ्यात त्यांनी शेती सुरू केली नाही, तर अन्य भूमिहीन इच्छुकाला वा त्यांच्या गटांना ती जमीन दिली जाई. दुसरीकडे नव्यानं विपणीही सुरू करण्यात आल्या. लोक तिथे नियंत्रणमुक्त भावानं भाज्या-फळं विकू लागले.

१९९६मध्ये, शहरी बागांमध्ये कोणत्याही रसायनाच्या वापरावर बंदी घालण्यात आली. त्या बागा-शेती पूर्णपणे 'सेंद्रिय' बनली. शहरी शेती खात्यानं, फळबाग-संघांनी आणि बीजगृहांनी जनतेचं ह्या बाबतीत व्यापक प्रशिक्षण केलं, नि सर्व निविष्टा आणि सेवा उपलब्ध करून दिल्या. बीज-संरक्षण/ संवर्धनाचीही चळवळ ह्या अंतर्गत सुरू झाली.

ह्या व्यतिरिक्त आणखी एका मार्गानं अन्ननिर्मिती करण्यात येऊ लागली : खतांचे गादीवाफे. अत्यंत निकृष्ट जमिनी; आता वापरत नसलेले सिमेंटचे वाहनतळ अशा ठिकाणी सेंद्रिय खतांच्या गादीवाफ्यांवर शेती करणं सुरू झालं. तिचं नाव organoponics. खाली उसाचा चोथा, त्याच्यावर शेणखत, थोडी माती नि वर पालापाचोळ्याचा ढीग पसरायचा.

अशा सर्व कृषिगत आणि व्यवस्थागत परिवर्तनांतून क्यूबानं त्याची सेंद्रिय क्रांती साकार केली आहे.

* * *

नव्या सहस्रकाच्या प्रारंभाच्या वेळी क्यूबानं यूनोच्या मानकांची बरोबरी केली होती : प्रतिव्यक्ती २६०० किलोकॅलरी अन्न आणि ६८ ग्रॅम प्रथिनं. (मानक : २४००/७२). ह्यातून लोकांचं आरोग्य सुधारलं. बालमृत्यूचा दर संयुक्त संस्थानांपेक्षाही कमी झाला. आयुर्मान सं.सं.इतकंच आहे : ७६ वर्षं. ५० वर्षांच्या अमेरिकी व्यापारबंदीला तोंड देत क्यूबानं हे साध्य केलं, हे सदैव लक्षात ठेवायचं.

*ह्या उपलब्धींकरता स्वीडनच्या संसदेनं क्यूबाच्या 'सेंद्रिय शेती संघटने'ला १९९९मध्ये 'Right Livelihood Award' हा (पर्यायी नोबेल) पुरस्कार देऊन गौरविलं.*

१९९०-२००२ ह्या काळात क्यूबाची लोकसंख्या १.०७ कोटींवरून १.१२ कोटी झाली; पण, कुपोषित क्यूबीयांचं प्रमाण मात्र ८ लाखांवरून ४ लाखांवर आलं. हृद्रोगांचं प्रमाण जगभर वाढत असताना क्यूबात, ह्या काळात, ते ४५%नं कमी झालं! सुधारलेली आरोग्याची प्रत आणि जीवनशैली हेच ह्यामागचं रहस्य. क्यूबीय जनता मांसाची भोक्ती; पण, ती आता शाकाहार मोठ्या प्रमाणावर घेते! कमी झालेलं प्रदूषण, शुद्ध बनत गेलेली हवा, सेंद्रिय अन्न, भरपूर शरीरश्रम ह्या साऱ्या खनिज तेलाच्या अभावाच्या देणग्या आहेत. क्यूबाला त्या

साऱ्यांतून आरोग्याची प्राप्ती झाली.

क्यूबातली आरोग्यसेवा अमेरिकेच्या तोडीची आहे : पण, अमेरिकेपेक्षा खूप स्वस्त. त्यामुळे लॅटिन अमेरिकतले बरेच रुग्ण ‘आरोग्य-पर्यटना’साठी क्यूबाला जातात. क्यूबाला त्यातून परकीय चलन मिळतं. क्यूबात एक आंतरराष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय आहे. तिथून शिकून गेल्यावर जो कोणी आपल्या देशातल्या गरीब लोकांसाठी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचं वचन देईल, त्याला तिथे मोफत शिक्षण मिळतं! क्यूबात डॉक्टर आणि शुश्रूंची संख्या आवश्यकतेपेक्षा अधिक आहे. हे अधिकचे तज्ज्ञ गरीब देशांना स्वस्तात उपलब्ध करून दिले जातात. असे २०,००० तज्ज्ञ लॅटिन अमेरिकी देशांत काम करत आहेत. ते रुग्णालयांऐवजी घराघरांत जाऊन विधायक आरोग्यासाठी समुपदेशनाचं आणि उपचारांचंही काम करतात.

क्यूबीय जनतेची सामाजिक एकता फार दृढ आहे. शहरी शेती करणारे अनेक जण गरिबांना मोफत भाज्या-फळं देतात. फुकटात वापरायला मिळालेल्या जमिनीचं भाडं म्हणून अनेक जण शाळा, बालवाड्या, रुग्णालयांना अन्नदान करतात.

* * *

खनिज तेलाअभावी क्यूबाला अन्यही अनेक बदल करावे लागले. शहरांतली लोकसंख्या कमी करून ती शेतीकडे वळवावी लागली. मोटारींचा वापर थांबला, नि त्या जागी २५० प्रवाशांना वाहून नेणाऱ्या ‘उंट’ नावाच्या बसगाड्या सार्वजनिक वाहतूक करू लागल्या. ट्रकांना मागे पायऱ्या जोडून त्यांचं ‘बस’मध्ये रूपांतर केलं गेलं. १९९३मध्ये चीनमधून २० लाख सायकली आयात केल्या गेल्या. सायकल-रिक्षांचा वापर वाढला. घोडागाड्या, खेचरगाड्या वाहतूक करू लागल्या. खासगी वाहनांचा पूर्ण वापर सुरू झाला. रिकाम्या सरकारी वाहनांना थांबवून त्यातून प्रवास करण्याचे अधिकार जनतेला दिले गेले.

खनिज तेलाच्या टंचाईतून क्यूबात सेंद्रिय क्रांती झाली. पण, तिचे विविध सुपरिणाम दूरगामी आहेत. शेतीला पुन्हा प्रतिष्ठा मिळाली. शिक्षित तरुण शहरांकडे धाव घेत : आता ते अभिमानानं शेती करतात. आरोग्य सुधारलं. शिक्षणाचा प्रसार झाला. कास्ट्रोपूर्व काळात ३००० लोकांमागे १ शिक्षक होता; २००४मध्ये ते प्रमाण ४२ : १ असं झालं!

### क्यूबापुढील आव्हानं

कास्ट्रोसारख्या खंबीर आणि दूरदृष्टीच्या नेत्यामुळेच हे सर्व असं होऊ शकलं. आता तो सत्तेवरून पायउतार झाला आहे. त्याच्या नंतरही हे असंच चालू राहू शकेल का?—ते एक आव्हानच आहे. दुसरं आव्हान आहे अमेरिका. तिनं समजा व्यापारबंदी उठवली, तर क्यूबात पुन्हा खनिज तेलाचा सुकाळ निर्माण होईल का? शेती पुन्हा रासायनिक बनेल का? थोडक्यात अमेरिका क्यूबातली सेंद्रिय क्रांती ‘मारून’ टाकेल का? क्यूबाची ‘मुक्तता’ करून क्यूबाला संपवण्याचं राजकारण अमेरिका करेल का? की, त्याही वेळी क्यूबा निर्धारानं आपलं कमावलेलं सेंद्रियत्व टिकवून ठेवेल? ‘स्वस्त’ रासायनिक शेती-उत्पादनांपुढे सेंद्रिय उत्पादनं ‘महाग’ ठरल्यानं नाइलाजानं क्यूबाला पुन्हा विनाशक मुख्य प्रवाहात सामील व्हावं लागेल का?

भविष्यात काहीही होवो : आज तरी क्यूबानं शेतीचं एक नवं—सेंद्रिय प्रतिमान—वास्तवात उतरवलं आहे, हे नक्की. ☯

क्यूबाविषयक लेखनासाठी पुढील पुस्तकांचा संदर्भ म्हणून वापर केला आहे :
(१) फिडेल, चे आणि क्रांती / अरुण साधू
(२) Organic Revolution! / भरत मनसाटा
(३) Cuba is Organic by Default; India can be Organic by Design / मनोहर परचुरे.

## क्यूबाविषयक अनुबोधपट

क्यूबाविषयक अनेक अनुबोधपट ‘यूट्यूब’वर इंग्रजी व स्पॅनिशमध्ये उपलब्ध आहेत. बऱ्याचशा पटांमध्ये १९९०नंतरच्या परिवर्तनाचं चित्रीकरण आहे; तर मोजक्या काहींत सद्य:स्थितीची माहिती आहे.

'The Power of Community : How Cuba Survived Peak Oil' हा अनुबोधपट पहिल्या गटातला प्रातिनिधिक म्हणता येईल. ‘आर्थर मॉर्गन इंस्टिट्यूट फॉर कम्युनिटी सोल्यूशन्स’ ह्या संस्थेनं अभ्यास करून बनवलेला हा १ तासाचा पट आहे. १९९०नंतर क्यूबात शेती, वाहतूक, घरे आणि ऊर्जा ह्या चार गोष्टींबाबत कोणती, कशी स्थित्यंतरे झाली हे त्यात दाखवलेले आहे. १९९०मध्ये क्यूबाची झालेली दयनीय स्थिती; १४ तासांचे भारनियमन; खनिज तेलाअभावीचे रिकामे रस्ते हे वास्तव प्रारंभी दिसते. विविध प्रयोग करत क्यूबाने ह्यातून कसा मार्ग काढला, हे प्रत्यक्षात पाहणे खूपच प्रभावी ठरते : ३०० माणसे वाहून नेणाऱ्या बसगाड्या, आयात केलेल्या सायकली, सायकलवरून कामावर जाणारे प्राध्यापक-सर्जन, इत्यादि.

महत्त्वाचे बदल झाले ते शेती-पद्धतीत. प्रारंभी घटलेले उत्पादन सेंद्रिय तंत्रांच्या अवलंबनातून पूर्वीच्या पातळीवर आले. शेतीचे सेंद्रीयीकरण, शहरी शेती, लोकांचा परिवर्तनशील सहभाग हे सर्व आपण ह्या अनुबोधपटात प्रत्यक्ष पाहतो.

संकटाला संधी बनवून क्यूबाने केलेला हा प्रवास बरेच काही शिकवून जाणारा, प्रेरणादायी आहे. लोकांची परस्पर-सहकार्याची; दुसऱ्याचा विचार करण्याची भावना ह्या मार्गबदलात त्यांना खूप उपयोगी पडलेली आहे.

* * *

'People and Power : Cuba—The Times Are Changing' हा दुसऱ्या गटातील अनुबोधपट आहे. रॉड्रिगो व्हॅस्क्युएझ ह्यांनी बनवलेला हा पट २५ मिनिटांचा आहे. क्यूबातील सध्याच्या स्थितीविषयी त्यातून माहिती मिळते.

१९५९मधील क्रांतीपासूनचा क्यूबाचा कारभार साम्यवादी व बंदिस्त राहिला. कोणी कोणते काम करायचे, कोणती पिके घ्यायची, कोणते उत्पादन किती घ्यायचे हे राज्य ठरवायचे. साऱ्या माध्यमांवर संपूर्ण सरकारी नियंत्रण होते. सरकारनं नेमलेले सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते. बेकारांना भत्ता मिळायचा. काही जण त्याचा गैरफायदा घेऊन भत्त्यावरच जगायचे–काम टाळायचे. २०१०पासून हे चित्र बदलत आहे. सरकारचे नियंत्रण आणि मदत दोन्ही कमी होत आहे. सरकारला परवडत नाही म्हणून मदत कमी. व्यवस्थेत जरा खुलेपणा येऊ लागला आहे. सरकारी दिरंगाई/दुर्लक्ष/चुका ह्यांबद्दलच्या तक्रारी कधीकधी माध्यमांमध्ये येऊ लागल्या आहेत. उद्योजकता असलेले लोक पुढे जाण्याची इच्छा बाळगतात; खाणावळ, हॉटेल, फुले विक्री केंद्र, इ. उघडतात. काहींना ते जमते–काहींना नाही. अशा गोष्टींसाठीचे परवाने, हिशेब ह्यांमध्ये सरकारी ढिलेपणा दिसतो.

थोडक्यात, २०१०पासून क्यूबा पुन्हा बदलाच्या प्रक्रियेत जात आहे. त्याची सद्य:स्थिती फार काही आदर्श, अनुकरणीय दिसत नाही.

*—नरेंद्र जोशी*

# राजा कालस्य कारणम्

ह्या अंकात आपण, भूतान आणि क्यूबा ह्यांनी आपापली परिस्थिती आणि गरज ह्यांनुसार विकसित केलेल्या विकास प्रतिमानांची सविस्तर माहिती घेतली.

ह्यांपैकी क्यूबाची पर्यायी विकासाची पद्धती ही ‘प्रतिमान’ म्हणावी इतकी व्यापक वा सर्वंकष आहे का ह्याविषयी माझ्या मनात संदेह आहे. क्यूबानं ना GDP ही संकल्पना नाकारली; ना पर्यायी मोजपट्टी पुढे ठेवली; ना जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्शणारा विकास-विचार पुढे ठेवला. क्यूबाला, कास्ट्रोला हे काही करायचंही नव्हतं. १९८९मध्ये, काही ऐतिहासिक कारणांमुळे झालेला आघात इतका प्रचंड मोठा होता की, कोणताही इझम, संकल्पना, तात्त्विक मांडणी ह्यांचा विचार करायला वेळ मिळणंही अशक्य होतं. प्रश्न जीवन-मरणाचा बनला होता. मात्र, त्यातून क्यूबानं ज्या तऱ्हेनं मार्ग काढला, ती पद्धत, दिशा मला आदर्शवत् वाटते. म्हणजे, तिकडे गोर्बाचेव्हनं रशियात जे केलं—ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोयका (मोकळीक आणि पुनर्रचना)—तेच कास्ट्रोनं इकडे क्यूबात केलं. क्यूबा सरकारीकरणाकडून खासगीकरणाकडे गेला. उत्पादन, विक्री ह्यांबाबत मोकळीक, उदारता आली. ह्यातून शेतीत दोन प्रमुख परिवर्तनं झाली : ती निर्याताभिमुखतेऐवजी उपजीविकाभिमुख बनली; नि त्याच ऐतिहासिक कारणांमुळे तिचं सेंद्रियीकरण झालं. हे सारं चांगलंच झालं; पण, ते अगतिकतेतून झालं. ‘करा वा मरा’ अशी स्थिती निर्माण झाली म्हणून झालं.

भूतानचं असं नाही. त्यानं जाणीवपूर्वक विकासाची पर्यायी, व्यापक संकल्पना स्वीकारली. तिला व्यावहारिक आकार-रूप दिलं. ‘विकासाचं नवं प्रतिमान’ म्हणता येईल इतका तिचा पट विस्तृत, व्यापक, सर्वसमावेशक केला.

सध्या ह्या दोन्हीही रचना त्या त्या देशांपुरत्या सीमित आहेत. जग त्यांच्याकडे कुतूहलानं बघतंय; पण, जगानं त्या अद्यापि स्वीकारलेल्या मात्र नाहीत. जग इतक्यात त्या स्वीकारणारही नाही. कारण जग चालवणारं खनिज तेल नावाचं इंधन अजून उपलब्ध आहे–मिळतंय. पण, अनेक तज्ज्ञांच्या मतानुसार खनिज तेलाच्या अधिकतम उपलब्धतेचा काळ (Peak Oil) संपलेला आहे, आणि इत:पर त्याचं उत्पादन आणि उपलब्धता घटतच जाणार आहे. त्यामुळे खनिज तेलाच्या जिवावर चाललेला ऊतमात संपून एके दिवशी साऱ्या जगाला क्यूबाचं प्रतिमान स्वीकारावंच लागणार आहे : तशाच अगतिकतेनं. पण, जग ते तेव्हाच स्वीकारेल–आज नाही! गांधींनी शंभर वर्षांपूर्वी स्वयंपूर्ण खेड्यांविषयी सांगितलं; टॉफलरनं पंचवीस वर्षांपूर्वी 'Prosumer Society' ह्या शब्दांत तीच संकल्पना पुढे मांडली. पण, जगानं ती रचना मुळीच स्वीकारली नाही. क्यूबावर तशीच वेळ आली, तेव्हाच त्यानं ती स्वीकारली. भूतानचं वैशिष्ट्य आणि मोठेपण हे की, वेळ न येताही त्यानं योग्य मार्ग स्वीकारला. क्यूबाची कृती reactive आहे, तर भूतानची pro-active.

व्हायला हवंय ते भूतानसारखं. एका प्रगल्भ जाणिवेतून सर्वच देशांनी विकासाची अशी व्यापक संकल्पना स्वीकारायला हवी आहे. त्यासाठी जगातल्या सत्ताधाऱ्यांचं प्रबोधन होण्याची खूप गरज भासते आहे. कारण, एक निश्चित आहे की, देशाच्या धोरणांना सत्ताधाऱ्यांनी योग्य दिशा दिली, तरच परिवर्तन होतं. ‘राजा कालस्य कारणम्’ ही म्हण अत्यंत सार्थ आहे. भूतान आणि क्यूबा ह्यांना योग्य विचाराचे सत्ताधीश मिळाले म्हणून त्यांनी विकासाचे योग्य पर्याय स्वीकारले.

पण, जर राज्यकर्ते असे प्रबुद्ध, जागृतजाणीव (enlightened) नसतील, तर काय करायचं? मला वाटतं की, आता लोकशाहीत जनतेनंच राज्यकर्त्यांना प्रबुद्ध बनवायला हवं. विकासाचा सुयोग्य विचार ‘वरून खाली’ (top down) येत नसेल, तर आता तो ‘खालून वर’ (bottom up) जायला हवा. लोकशाहीत ही जबाबदारी जनतेची आहे. लोकांनी चंगळवादी उपभोग मागितले, तर राज्यकर्ते तेच देतील. पण, लोकांनी सम्यक् विकासाची मागणी केली, तर राज्यकर्त्यांना तो द्यावा लागेल. मात्र, लोकांनी ती मागणी करायची, तर आधी लोकांचंच खूप मोठं प्रबोधन व्हावं लागेल. लोकांना तो विचार आधी समजून घ्यावा लागेल; जीवनात-कृतीत उतरवावा लागेल. हे झालं की, लोकच पुढे होऊन सम्यक् विकासाची वाट चालू लागतील. अन् मग 'When followers lead, leaders follow' ह्या न्यायानं राज्यकर्तेही ती वाट चालू लागतील. आता ‘जनता कालस्य कारणम्’ असं व्हायला हवं.

एखादा कास्ट्रो, एखादा जिग्मे सिंग्ये परमेश्वरानं दिल्लीच्या सिंहासनावर बसवण्याची वाट पाहण्यापेक्षा, जनजागृतीच्या प्रयत्नांतून असा सत्ताधीश जनतेतूनच निर्माण होणं हे लोकशाहीला साजेसं आहे. ग.सं.चा हा अंक प्रसिद्ध करण्यामागे ह्या लोकशाही प्रक्रियेला एक धक्का-गती देण्याचा हेतू आहे. आधी जनप्रबोधन, त्यातून हरित राजकारण, त्यातून हरित राज्यकर्ते नि त्यातून हरित विकास अशी ही साखळी आहे. ‘ही साखळी पुरी होऊन हरित विकासाचं पर्व केव्हा सुरू होणार’, असा विचार कुणाच्याही मनात येईल. मला आज असं वाटतं की, ही साखळी पुरी होण्याच्या आधीच—किंबहुना जनतेची आणि राज्यकर्त्यांची जाणीवजागृती होण्याच्या आधीच—क्यूबावर ओढवली तशी परिस्थिती साऱ्या जगावर ओढवणार आहे. ती Peak Oilमुळे ओढवेल; जागतिक तापमानवाढीमुळे ओढवेल; की, आणखी कशामुळे, हे सांगता येणार नाही. अन् त्यावेळी क्यूबाप्रमाणेच साऱ्या जगावर सेंद्रिय, स्थानिक, उपजीविकाभिमुख असं होण्यावाचून पर्याय नसेल.

पण, हे कधी होईल हे सांगता येणार नाही; नि तोवर स्वस्थ बसूनही भागणार नाही. Reactionपेक्षा Pro-actionमधून जग बदलावं असं ज्याला वाटतं, त्यानं तोवर प्रबोधनाचं काम करत राहायलाच हवं. ते काम ग.सं. करत आहे–करेल. हा अंक हा त्या दृष्टीनेच केलेला एक अल्पशक्ती प्रयोग.

(ह्या अंकातील लेखनासाठी अतुल पिटकर, मुंबई; अजित बर्जे, नाशिक आणि अमेय कुलकर्णी, पुणे ह्यांनी संदर्भसाहित्य पुरवलं. त्यांना मन:पूर्वक धन्यवाद! —संपादक)

**सौर दिनदर्शिका** सौर अग्रहायण, शके १९३६ (नोव्हेंबर-डिसेंबर २०१४)

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० 21 डिसें. | | | | | | १ नोव्हें. 22 |
| २ 23 | ३ 24 | ४ 25 | ५ 26 | ६ 27 | ७ 28 | ८ 29 |
| ९ 30 | १० 1 | ११ 2 | १२ 3 | १३ 4 | १४ 5 | १५ 6 |
| १६ 7 | १७ 8 | १८ 9 | १९ 10 | २० 11 | २१ 12 | २२ 13 |
| २३ 14 | २४ 15 | २५ 16 | २६ 17 | २७ 18 | २८ 19 | २९ 20 |

**गतिमान ☯ संतुलन**

❑ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❑ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❑ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिनाअखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❑ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❑ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❑ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले.
संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक** (Registered Newspaper)

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३०
डाकघरातून; दरमहा दि.२१ला

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2012-14
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना क्र. : WPP-13

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिठ्ठीवरचा कालावधी **ऑक्टो.१४ वा नोव्हें.१४** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक कालावधी पर्यंत

**प्रति**

**प्रेषक**
गतिमान संतुलन,
कुडावळे ४१५७१२,
ता. दापोली, जि. रत्नागिरी



पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002